




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. ०९ जानेवारी २०२६








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०५३ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com





# विमानतळ अदानींच्या घशात घालण्याचा 'प्लॅन' : ठाकरे

## तेलंगणा, पंजाबमध्ये बॅलेट पेपरवर मतदान झाले, तिथे भाजप चौथ्या, सातव्या नंबरवर फेकला गेला : राज ठाकरे

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राच्या राजकारणात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले आहेत. संजय राऊत, ज्येष्ठ अभिनेते महेश मांजरेकर यांच्यासोबतच्या चर्चेत दोन्ही बंधुंनी सत्ताधारी भाजप आणि केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे. "मुंबई तोडण्याचा आणि येथील संपत्ती गुजरातला पळवण्याचा कट रचला जात असून, राज्यातील सध्याचे मुख्यमंत्री केवळ 'दिल्लीचे आदेश' पाळणारे बाहुले आहेत," अशी घणाघाती टीका राज ठाकरे यांनी केली आहे. या चर्चेत ईव्हीएमच्या मुद्द्यावर बोलताना राज ठाकरे यांनी तेलंगणा आणि पंजाबमधील जिल्हा परिषद निवडणुकांचा दाखला दिला. ते म्हणाले की, "जेव्हा मतदान बॅलेट पेपरवर झाले, तेव्हा भाजप सातव्या आणि चौथ्या क्रमांकावर फेकला गेला. ईव्हीएम आणि मोदींची जादू नसेल, तर भाजपचा पत्त्यांचा बंगला कोसळेल."



आता तेलंगणा आणि पंजाबमध्ये जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्या. तिथे मतदान बॅलेट पेपरवर झालं. तेलंगणात भारतीय जनता पक्ष सातव्या नंबरवर गेला आणि पंजाबमध्ये चार नंबरवर गेला. हे बॅलेट पेपरवर सिद्ध झालंच ना. कर्नाटकातही तेच झाले. बॅलेट पेपरवर निकाल भाजपच्या बाजूने लागत नाहीत, असा दावा राज ठाकरे यांनी केला आहे. त्यांच्याकडे मोदी आणि ईव्हीएम आहे. लहानपणी आपण सगळे पत्त्यांचा बंगला करायचो.. यांच्याकडेसुद्धा बघितलं तर पत्त्यांचा बंगला आहे पण तो उलटा आहे. खालचा पत्ता आहे तो नरेंद्र मोदींचा आहे आणि आता हे जे सगळे बोलताहेत ते केवळ नरेंद्र मोदींच्या जिवावर बोलताहेत. भारतीय जनता पक्षाला आज जे काही मतदान होतंय ते फक्त नरेंद्र मोदींच्याच नावावर होतंय. यांच्या कोणाच्याही नावावर होत नाही, असे राज म्हणाले.

राज ठाकरे यांनी मुंबईतील विमानतळाबाबत एक मोठा गौप्यस्फोट केला. त्या दिवशी माझ्या एका भाषणात मी असं म्हटलं होतं की, मुंबईनंतर नवी मुंबईत जे विमानतळ झालंय, मुंबईतल्या हक्काच्या विमानतळावरील सगळा कार्गो तिथे नवी मुंबईतल्या विमानतळावर हलवतील.

### "मुंबईची संस्कृती मारली जातेय" - उद्धव ठाकरे

चर्चेत उद्धव ठाकरे यांनी मुंबईच्या अस्मितेचा मुद्दा मांडला. "मुंबई महाराष्ट्रापासून भौगोलिकरीत्या कोणीही तोडू शकणार नाही, पण येथील मराठी संस्कृती आणि अस्मिता पद्धतशीरपणे मारली जात आहे. मुंबईवर हिंदीची सक्ती केली जात असून, मराठी माणसाला हद्दपार करण्याचा प्रयत्न सुरू आहे," असे उद्धव ठाकरे म्हणाले.

### फडणवीसांच्या 'गर्जना' केवळ दिखावा?

संजय राऊत यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या "मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होऊ देणार नाही" या विधानाचा संदर्भ दिला असता, राज ठाकरेंनी सडेतोड उत्तर दिले. ते म्हणाले, "त्यांच्या हातात काहीच नाही. दिल्लीतून (मोदी-शहा) जो आदेश येईल, त्यावर केवळ सही करणे एवढेच काम येथील राज्यकर्त्यांचे आहे. 'ओबे द ऑर्डर' हेच सध्याच्या सरकारचे ब्रीदवाक्य आहे."

# नाशिकमध्ये राज-उद्धव ठाकरेंची राज्यातील आज पहिलीच संयुक्त सभा

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

महापालिका निवडणुकीत शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि मनसे यांची युती झाल्यानंतर उभय पक्षांचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची राज्यातील पहिलीच एकत्रित जाहीर सभा शुक्रवारी सायंकाळी नाशिकमध्ये होत आहे. त्र्यंबक रस्त्यावरील हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर होणारी ही सभा गर्दीचे सर्व विक्रम मोडीत काढेल, असा दावा स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

शिवसेना ठाकरे गट आणि मनसे यांची युती जाहीर झाल्यानंतर नाशिकमध्ये विलक्षण घडामोडी घडल्या. ठाकरे बंधू एकत्रित आल्याचा जल्लोष करणारे दोन्ही पक्षांचे स्थानिक प्रमुख नेते दुसऱ्याच दिवशी भाजपमध्ये दाखल झाले. नाशिक महापालिकेच्या निवडणुकीत ठाकरे गट, मनसे, राष्ट्रवादी शरद पवार गटाबरोबर काँग्रेसही



सहभागी झाली आहे. मुंबईसह राज्यात ठाकरे गट आणि मनसेच्या नव्या राजकीय समीकरणाने नेमके काय घडणार, याबद्दल उत्सुकता आहे. ठाकरे बंधुंच्या राज्यातील पहिल्याच संयुक्त सभेसाठी नाशिकची निवड झाल्यामुळे पदाधिकाऱ्यांनी जय्यत तयारी केली आहे.

हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान हे नाशिकमधील सर्वात विस्तीर्ण मैदान आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांसारख्या काही निवडक नेत्यांच्या सभांवेळी हे मैदान भरलेले दिसल्याचा इतिहास आहे. निवडणुकीत राज्यातील अन्य काही प्रमुख नेतेही या मैदानावर कधीकधी सभा घेतात. परंतु. गर्दी जमवता जमवता संबंधितांच्या पदाधिकाऱ्यांची दमछाक झाल्याची उदाहरणे आहेत. राज आणि उद्धव ठाकरे यांची राज्यातील पहिली सभा यशस्वी करण्यासाठी आघाडीतील सर्व पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते कामाला लागले आहेत. खासदार अरविंद सावंत यांनी अलीकडेच बैठक घेऊन आढावा घेतला होता. महापालिकेच्या ३१ प्रभागात १२२ जागांवर आघाडीचे उमेदवार आहेत. काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होत आहे.

आधीच्या नियोजनानुसार उद्धव ठाकरे यांची सभा नऊ जानेवारीला तर राज ठाकरे यांची सभा ११ जानेवारीला नियोजित होती. परंतु, नंतर दोन्ही पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी संयुक्त सभेचा आग्रह धरल्यानंतर उभयतांनी तो मान्य करून ही एकत्रित सभा होत असल्याचे माजी आमदार वसंत गिते यांनी सांगितले. या सभेसाठी प्रत्येक प्रभागातून दोन ते तीन हजार नागरिक सहभागी होतील, असे गिते यांनी सूचित केले. मनसेचे प्रमुख राज ठाकरे हे शुक्रवारी दुपारी दोन वाजता विमानाने नाशिकमध्ये दाखल होणार आहेत. तर उद्धव ठाकरे हे चार वाजता येतील. ठाकरे बंधू एकाच हॉटेलमध्ये थांबतील. आणि नंतर सभास्थळी येतील, असे सांगण्यात आले.

# शूटर मर्चेंटचा हर्सूल कारागृहात मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)**

- गुलशन कुमार यांच्या हत्येप्रकरणी भोगत होता जन्मठेपेची शिक्षा



संगीत क्षेत्रातील दिग्गज आणि टी-सीरीजचे मालक गुलशन कुमार यांच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला कुख्यात शूटर अब्दुल रऊफ मर्चेंट (६०) याचा गुरुवारी (दि.८) सकाळी मृत्यू झाला. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्याचा मृत्यू झाल्याची माहिती कारागृह प्रशासनाच्यावतीने देण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रऊफ मर्चेंटची प्रकृती गेल्या काही दिवसांपासून खालावली होती. ३० डिसेंबर रोजी त्याला सौम्य हृदयविकाराचा झटका आल्याने घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर प्रकृतीत सुधारणा झाल्याने ४ जानेवारी रोजी त्याला पुन्हा कारागृहात आणले गेले. मात्र गुरुवारी सकाळी पुन्हा त्याला अस्वस्थ वाटू लागल्याने तातडीने घाटी रुग्णालयात नेण्यात आले, परंतु उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. हर्सल कारागृह अधीक्षक खामकर यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

## थोडक्यात...

### तरुणाचे अपहरण करून मारहाण

छत्रपती संभाजीनगर (समर्थ गांवकरी) : चारित्र्याच्या संशयावरुन एका 19 वर्षीय तरुणाचे अपहरण करून लोखंडी रॉड आणि चाकूने बेदम मारहाण करत त्याची निघृण हत्या केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. अनिकेत अण्णा राऊत (19, रा. रमाईनगर, हसूल) असे मृत तरुणाचे नाव आहे. बुलेट व दुचाकीवर आलेल्या चौघांनी त्याचे 2 जानेवारीला अपहरण करून भीम टेकडीवर नेऊन जबर मारहाण करून घाटी रुग्णालयाजवळ टाकून पसार झाले होते. उपचारदरम्यान बुधवारी (दि.7) अनिकेतचा दुर्दैवी मृत्यू झाला. हसूल पोलिसांनी गुन्हा दाखल होताच आरोपी संकेत मोतीलाल गायकवाड (24), विकास शेषराव वाघमारे (21) आणि आदित्य राजू आव्हाड (18, तिघेही रा. एकतानगर, हसूल) यांना अटक केल्याची माहिती पोलिस निरीक्षक स्वाती केदार यांनी गुरुवारी (दि.8) दिली. तिन्ही आरोपींना 13 जानेवारीपर्यंत न्यायालयाने पोलिस गुन्ह्यात अटक केलेले आरोपी.

### उमेदवारासह कार्यकर्त्यांवरही गुन्हा

छत्रपती संभाजीनगर(समर्थ गांवकरी) : गेल्या दोन दिवसांपासून एमआयएम आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या राड्यामुळे जिन्सी आणि सिटी चौक भागात तणाव निर्माण झाला आहे. माजी खा. इम्तियाज जलील यांच्या वाहनावर झालेल्या हल्ल्यानंतर, काँग्रेसच्या कलीम कुरेशीसह 50 जणांवर जिन्सी ठाण्यात गुन्हा दाखल झाला. तर आता काँग्रेसच्या उमेदवारानेही एमआयएमचे उमेदवार फेरोज खान यांच्यासह कार्यकर्त्यांवर सिटी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे हा संघर्ष टोकाला गेला आहे. फेरोज खान मोईनोद्दीन खान (रा. शहागंज), अफरोज खान मोईनोद्दीन खान, अकबर खान मोईनोद्दीन खान, माजेद खान, असरार खान, रहीम खान, रफीना बेगम, मुजाहेद खान शकील खान, अदनान अश्रफ हुसैन, मास खान, आमेर आदींचा आरोपींमध्ये समावेश आहे.

# शेअर बाजारात तेजी; सेन्सेक्स 150 अंकांनी वधारला

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

आठवड्याच्या शेवटच्या दिवशी बाजाराची सुरुवात हिरव्या रंगात झाली. सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्स सुमारे 150 अंकांनी वाढून 84,337च्या आसपास व्यवहार करत होता. तर निफ्टी 45 अंकांच्या वाढीसह 25,922च्या पातळीवर पोहोचला. बँक निफ्टीमध्ये मात्र फारशी हालचाल दिसली नाही. प्रमुख शेअर्समध्ये ONGC, BEL, Asian Paints, Power Grid, HCL Tech, Tech Mahindra यांसारख्या शेअर्समध्ये चांगली खरेदी पाहायला मिळाली. दुसरीकडे Adani Enterprises, Adani Ports, ICICI Bank, Shriram Finance, NTPC आणि Max Healthcare या शेअर्समध्ये किंचित घसरण झाली. दरम्यान, Vodafone Ideaचा शेअर सुमारे 5 टक्क्यांनी वाढला आहे.


देशांतर्गत आणि जागतिक पातळीवर अनेक घडामोडी बाजाराच्या दिशेवर परिणाम करत आहेत. परदेशी गुंतवणूकदारांची सततची विक्री, अमेरिकन बाजारांकडून मिळालेले संमिश्र संकेत, कमोडिटी बाजारातील चढ-उतार आणि आयपीओ, या सगळ्यांवर गुंतवणूकदारांची नजर आहे. परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी (FII) गुरुवारीही विक्रीचा सपाटा लावला. त्यांनी सुमारे 11,922 कोटी रुपयांची निव्वळ विक्री केली. सलग चौथ्या दिवशी एफआयआय बाजारातून पैसा काढताना दिसले. मात्र, देशांतर्गत संस्थागत गुंतवणूकदारांनी (DII) विश्वास कायम ठेवत सलग 93व्या दिवशी खरेदी सुरू ठेवली. त्यांनी जवळपास 3,700 कोटी रुपयांची गुंतवणूक केल्यामुळे बाजारातील घसरण काही प्रमाणात कमी झाली.

# पाणंद रस्त्यांना सात-बारा उताऱ्यावर मान्यता; वर्षानुवर्षांचे वाद संपणार

- नकाशावर दर्शविलेले पाणंद रस्ते सात-बारा उताऱ्यावर नोंदविण्याची भूमिअभिलेख विभागाची राज्यव्यापी मोहीम
- पुढील महिन्यापासून अंमलबजावणी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

राज्य शासनाने राज्यात पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करण्याची मोहीम सुरू केली आहे. त्यामुळे आता भूमी अभिलेख विभाग असे पाणंद रस्ते नकाशावर दिसत असल्यास त्यांची नोंद सात-बारा उताऱ्यावर करणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी पुढील महिन्यात करण्यात येणार आहे. सात-बारा उताऱ्यावर रस्त्याचा उल्लेख झाल्याने असे रस्ते मोकळे करून देण्यासाठी शेतकऱ्यांना जागा द्यावी लागणार आहे. परिणामी, अनेक



वर्षांपासूनचे पाणंद रस्त्यांसंदर्भातील वाद निकाली निघणार आहेत.

शेतकऱ्यांसाठी पेरणी आंतरमशागत, कापणी, मळणी या कामांसाठी, तसेच शेतीमाल बाजारात पोहोचविण्यासाठी बारमाही रस्ते असणे आवश्यक असतात. अनेक ठिकाणी अशा रस्त्यांवर अतिक्रमण झाले असून, त्यांची गुणवत्ता पुरेशी नसल्याने शेतकऱ्यांना मोठी समस्या जाणवते. या पार्श्वभूमीवर शेत रस्ते, पाणंद रस्ते अधिक प्रभावीपणे सक्षम करण्याकरिता त्यांची मजबुती करण्याची योजना तयार केली आहे. या योजनेला 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना नाशिक' असे नाव देण्यात आले आहे. हे रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी, तसेच प्रत्यक्षात जागेवर उपलब्ध करून देण्यासाठी भूमी अभिलेख विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

अनेक शेत रस्ते, पाणंद रस्ते नकाशावर उपलब्ध आहेत. मात्र, सात-बारावर त्यांचा उल्लेख नसल्याने अनेक शेतकरी आपल्या शेतातून पाणंद रस्ते काढून देण्यास नकार देतात. प्रशासनाने हा रस्ता मोकळा करण्याचा प्रयत्न केल्यास त्यात न्यायालयीन प्रक्रिया होऊन त्यावर स्थगिती आणली जाते.

अनेक शेत रस्ते, पाणंद रस्ते नकाशावर उपलब्ध आहेत. मात्र, सात-बारावर त्यांचा उल्लेख नसल्याने अनेक शेतकरी आपल्या शेतातून पाणंद रस्ते काढून देण्यास नकार देतात. प्रशासनाने हा रस्ता मोकळा करण्याचा प्रयत्न केल्यास त्यात न्यायालयीन प्रक्रिया होऊन त्यावर स्थगिती आणली जाते.

### शेतकऱ्यांच्या संमतीनेच आखणी

भूमी अभिलेख विभाग आता नकाशावर असलेले रस्ते सात-बारा उताऱ्यावर नोंदविणार आहे. त्यामुळे सात-बारा उताऱ्यावरील पाणंद रस्त्यांची आखणी शेतकऱ्यांच्या संमतीने त्यांच्या शेतातून केली जाणार आहे. सात-बारा उताऱ्यावर उल्लेख असल्यास शेतकरीदेखील रस्त्याला विरोध करणार नाहीत, अशी स्थिती आहे. त्यामुळे पुढील महिनाभरात या रस्त्यांची नोंदणी सात-बारा उताऱ्यावर करण्यासाठी राज्यभरात मोहीम आखण्यात आली आहे.

# अजित पवार गटाच्या उमेदवारासह आठजण हद्दपार

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कारवाई; राजकीय वर्तुळात खळबळ

**मिरज : (समर्थ गांवकरी)**

महापालिका निवडणुकीचा प्रचार सुरू असताना मिरजेतील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचा उमेदवार आझम काझी याच्यासह आठजणांना सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांतून एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे. शुक्रवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मिरज दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर पोलिस अधीक्षकांनी ही कारवाई केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. मिरजेतील प्रभाग क्रमांक सहामधून राष्ट्रवादीच्या माजी नगरसेविका रजिया काझी यांचा मुलगा आझम काझी याला माजी महापौर मैनुद्दीन बागवान, जरीना बागवान आणि नर्गिस सय्यद यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातर्फे उमेदवारी देण्यात आली आहे. एक वर्षापूर्वी मिरजेतील स्टेशन रोड परिसरात व्यावसायिक वादातून अफगाण हॉटेलवर हल्ला करून तोडफोड केल्याप्रकरणी आझम काझी याच्यासह अस्लम काझी, शोएब काझी, मतीन काझी, अक्रम काझी, रमेश कुंजिरे, अल्ताफ रोहिले व मोहसिन गोदड यांच्याविरुद्ध शहर पोलिसांत गुन्हा दाखल आहे. या गुन्हेगारी कृत्यांच्या



पार्श्वभूमीवर आझम काझी व इतर आरोपींविरोधात पोलिस अधीक्षकांकडे हद्दपारीचा प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. या प्रस्तावानुसार पोलिस अधीक्षक संदीप घुगे यांनी आझम काझी याच्यासह आठजणांना सांगली व कोल्हापूर या दोन जिल्ह्यांतून एक वर्षासाठी हद्दपार करण्याचा आदेश दिला आहे. या कारवाईमुळे निवडणूक प्रचार व स्थानिक राजकारणावर काय परिणाम होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाने गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या अनेक उमेदवारांना निवडणुकीत उभे केले आहे. त्यातून राष्ट्रवादी अजित पवार पक्ष व भाजपामध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. त्याचवेळी सांगली महापालिका क्षेत्रातील अजित पवार गटाचा उमेदवार काझी याच्यावर हद्दपारीची कारवाई झाली आहे.

# कन्नडसक्ती करणाऱ्यांचा मल्याळीसक्तीला विरोध

## कर्नाटक सीमाभाग विकास प्राधिकरणाची दुटप्पी भूमिका; केरळच्या राज्यपालांना साकडे

**बेळगाव: (समर्थ गांवकरी)**

बेळगावसह सीमाभागातील मराठीचे अस्तित्व पुसून टाकण्याचा चंग बांधून कन्नडची सक्ती करणाऱ्यांना आता कन्नडच्या अस्तित्वासाठी टाहो फोडावा लागत आहे. केरळ सरकारच्या नवीन भाषा धोरणाला विरोध करत कासरगोड भागात मल्याळमची सक्ती करण्यात येऊ नये, अशी मागणी कर्नाटक सीमाभाग विकास प्राधिकरणाने केरळच्या राज्यपालांकडे केली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून बेळगावसह सीमाभागातील 865 गावांतून कन्नडची सक्ती करण्यात येत आहे. मराठीचे अस्तित्व पुसून टाकण्यासाठी कानडीकरणाचा वरवंटा सातत्याने फिरविण्यात येत आहे. तर दुसरीकडे




केरळ राज्यात कन्नड भाषिकांची संख्या अधिक प्रमाणात असणाऱ्या कासरगोड जिल्ह्यात मल्याळमची सक्ती करण्यात येऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे. कन्नड नेत्यांनी केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची भेट घेत सदर भाषा धोरणाला मंजुरी देऊ नये, अशी मागणी केली आहे.

केरळच्या विधिमंडळात मल्याळम भाषा विधेयक 2025 मंजूर करण्यात आले आहे. याला राज्यपालांनी अद्याप मंजुरी दिलेली नाही. नवीन विधेयकानुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये प्रथम भाषा म्हणून मल्याळम शिकविण्याची तरतूद करण्यात आली आहे. याचा फटका कासरगोड भागात असणाऱ्या कन्नड शाळांना बसणार आहे. केरळ सरकारच्या धोरणामुळे कन्नड नेत्यांना केरळमधील कन्नड भाषिकांचा पुळका आला आहे. त्यांनी याबाबत चिंता व्यक्त करत सदर विधेयक घटनाविरोधी असल्याची ओरड सुरु केली आहे. यापूर्वी 2017 मध्येही याचप्रकारचे विधेयक मंजूर करण्यात आले होते. परंतु तत्कालीन राज्यपालांनी त्याला मंजुरी दिली नव्हती.

# महान कामगार नेते शहीद दादा रूपमय चटर्जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्रद्धांजली सभा

**पुणे (भोसरी) : (समर्थ गांवकरी)**

महान कामगार नेते शहीद दादा रूपमय चटर्जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी शहीद दादा रूपमय चटर्जी चौक, भोसरी, पुणे येथे TUCC सेंट्रल ट्रेड युनियन संलग्न सर्व संघटनांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले.

या सभेस TUCC सेंट्रल कमिटीचे अध्यक्ष श्री. के. इंदु प्रकाश मेनन यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी TUCC महाराष्ट्र राज्य समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य, युनियनशी संलग्न विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने कामगार बांधव उपस्थित होते.



यावेळी बोलताना उपस्थित मान्यवरांनी शहीद दादा रूपमय चटर्जी यांनी कामगार वर्गासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा आढावा घेतला. त्यांनी कोलकाता व पुणे येथील गोळाबारूद निर्माणीमध्ये केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या संघटनांची स्थापना करून कामगारांना संघटित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. तसेच असंघटित क्षेत्रातील विविध कामगारांना एकत्र आणून त्यांच्या हक्कांसाठी सातत्याने लढा दिला.

शहीद दादा रूपमय चटर्जी हे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या त्याग, तपस्या, बलिदान व विचारसरणीवर आधारित कार्य करणारे नेते होते. कामगारांच्या हक्कांच्या रक्षणासाठी संघर्ष करत असताना ३१ डिसेंबर १९८३ रोजी ते अपघातग्रस्त झाले व ६ जानेवारी १९८४ रोजी त्यांचे निधन झाले.

दरवर्षी त्यांच्या पुण्यतिथी सप्ताहात विविध सामाजिक व कल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करून त्यांना आदरांजली अर्पण करण्यात येते. याच परंपरेनुसार यावर्षीही सर्व संघटनांच्या वतीने अनाथाश्रमांना मदत, रक्तदान शिबिर, तसेच विविध सामाजिक शिबिरे आयोजित करून स्मृती सप्ताह साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व पदाधिकारी व कामगारांनी शहीद दादा रूपमय चटर्जी यांच्या विचारांना पुढे नेण्याचा व कामगार हितासाठी सातत्याने लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला.

# जिल्हा बँक शेतीतज्ञ समिती सदस्य पदी कृषिभूषण पोखरकर यांची फेरनिवड

**अकोले: (समर्थ गांवकरी)**

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सन २०२५-२६ सालातील शेतकरी सभासदांना वितरित केल्या जाणाऱ्या पीक कर्ज विषयक धोरण ठरविण्यासाठी नियुक्त केलेल्या शेतीतज्ञ समितीच्या सदस्य पदी अकोले तालुक्यातील कोतुळ येथील प्रयोगशील शेतकरी आणि महाराष्ट्र शासनाचा कृषिभूषण पुरस्कार विजेते शेतीतज्ञ सयाजीराव पोखरकर यांची फेरनिवड करण्यात आली आहे.



अहमदनगर जिल्हा सहकारी बँक विविध पिकांचे वार्षिक कर्ज विषयक धोरण नाबार्डच्या निकषानुसार आणि सूचनांनुसार ठरवित असते.विविध पिकांबरोबरच पशुपालन,पक्षीपालन,मत्स्य व्यवसाय याकरिता खेळते भांडवल उपलब्ध करून देते संबंधित कर्जदार विषयक धोरण निश्चित करण्यासाठी या समितीची नियुक्ती केली जाते. कृषिभूषण सयाजीराव पोखरकर हे स्वतः कृषी पदवीधर असून त्यांनी यापूर्वीही या समितीचे सदस्य पद भूषविले आहे.

श्री.पोखरकर कोतुळ परिसरातील एक प्रयोगशील शेतकरी असून महाराष्ट्र सरकारने त्यांना वसंतराव नाईक शेती मित्र 2013 आणि वसंतराव नाईक कृषिभूषण 2020 या पुरस्कारांनी सन्मानित केलेले असून ऊस,आद्रक,फुलपिके व भाजीपाला पिकासोबतच त्यांचा ऊस शेतीचा विशेष अभ्यास आहे. आंतरराष्ट्रीय शेतीचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी इस्रायल आणि जॉर्डन या देशांचा अभ्यास दौरा ही पूर्ण केलेला आहे. त्यांच्या या निवडीबद्दल बँकेचे चेअरमन मा.आ. चंद्रशेखर भाऊ घुले पाटील, बँकेचे संचालक व अगस्ती कारखान्याचे चेअरमन सिताराम पाटील गायकर,आमदार डॉ.किरणजी लहामटे,आमदार आशुतोष काळे,संचालक मधुकरराव नवले,संचालक अमितदादा भांगरे यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



# गहाळ ५२ मोबाईल शोधून मूळ मालकांना परत!

**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**

- ६ लाख रुपयांची मालमत्ता नागरिकांच्या हाती
- अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाची उल्लेखनीय कामगिरी!

महाराष्ट्र पोलीस दलाच्या श्रीरामपूर (अहिल्यानगर उत्तर) विभागाने नागरिकांना दिलासा देणारी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. विभागांतर्गत येणाऱ्या १७ पोलीस स्टेशन हद्दीत विविध ठिकाणी गहाळ झालेल्या मोबाईलबाबत दाखल तक्रारींच्या अनुषंगाने सखोल तपास करण्यात आला.

तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने केलेल्या तपासात एकूण ६,००,०००/- रुपये किमतीचे ५२ मोबाईल शोधून काढण्यात यश आले. मिळून आलेल्या मोबाईलचे मूळ मालक शोधून त्यांच्याशी संपर्क साधण्यात आला व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सदर मोबाईल मूळ मालकांना सुपूर्द करण्यात आले. या कारवाईमुळे गहाळ मोबाईलबाबत निराश झालेल्या नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, पोलीस दलाच्या तत्परतेबाबत सकारात्मक प्रतिक्रिया उमटत आहेत. नागरिकांनी गहाळ मोबाईलबाबत त्वरित तक्रार नोंदवावी, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात आले आहे.

ही कामगिरी अपर पोलीस अधीक्षक कार्यालय, श्रीरामपूर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून, तांत्रिक तपास आणि समन्वयातून नागरिकांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्याचा पोलिसांचा निर्धार अधोरेखित झाला आहे.

# कुसुमबाई दाचावार यांचे निधन

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**



सिडको भागातील वात्सल्य नगर सोसायटी येथील जेष्ठ महिला नागरीक कुसुमबाई राम दाचावार वय 90 वर्ष यांच्ये वृद्धापकाळाने रहात्या निवासस्थानी 7 जानेवारी रोजी रात्री 11 वाजता निधन झाले,त्याचा पश्चात तीन मुले,दोन मुली नातु नातवंडे असा परिवार असुन व्यंकटेश्वर किराणा सिडकोचे रमेश दाचावार यांच्या त्या मातोश्री होत्या.त्याचां पार्थिव देहावर 8 जानेवारी रोजी सिडको येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी कुटुंबातील सदस्यांसह मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रसिद्ध भाजी भाकर महाप्रसाद होणार; यात्रा भरणार नाही

- यात्रेला मनोरंजन, आकाश पाळणे, दुकानें लागणार नाही मंदिर कमिटीचा निर्णय

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

मराठवाड्यात प्रसिद्ध असलेल्या बारालिंग भाजी भाकर महाप्रसाद पूर्ती मर्यादित ठेवण्याचा मंदिर कमिटीच्या निर्णय. हदगाव तालुक्यातील तामसा येथील मकर संक्रांतीच्या करी निमित्त दीडशे वर्षापासून सुरू असलेली भाजी भाकर महाप्रसाद चा आयोजन दरवर्षीप्रमाणे यावर्षी होणार परंतु गतवर्षी या महाप्रसाद यात्रेला गालबोट लागल्यामुळे यावर्षी मंदिर कमिटीच्या ऐतिहासिक निर्णय समोर येत आहे यावर्षी भाजी भाकर महाप्रसाद पूर्ती मर्यादित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. या भाजीभाकर फक्त महाप्रसाद



चा वितरण होईल. अलौकिक या महाप्रसादाचा हा सोहळा मराठवाडा, विदर्भ सह, शेजारी असलेल्या आंध्रप्रदेश,तेलंगाना, कर्नाटक राज्यातून भाविक विशेष उपस्थिती नोंदविता.. @सर्व धर्म एकात्मितेचा उज्वल उदाहरण पाहायला मिळतील.यात्रेच्या स्वरूप बदलणार गत वर्षी या यात्रेत काही असामाजिक तत्व छेडखानी च्या कारणाने दोन गटात राडा होऊन गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याने या वर्षी असामाजिक तत्वाचे जमाव होऊ नये या साठी मनोरंजन सारख्या आकाश पाळणे, हॉटेल, छोट्या मोठ्या यात्रेला व्यवसाय करणाऱ्या विक्रेता ना मंदिर कमेटी न आव्हान करून यात्रेला कोणत्याही दुकाना, स्टॉल, बेलफूल, नारियल, पूजेच्या साहित्य दुकानें न लावण्याचे आव्हान करण्यात आली.@१५०क्विंटल ज्वारी ची भाकरी, ४५०क्विंटल भाजी शिजवून प्रसाद स्वरूप वितरण केलं जाते रामायण कालीन सुरु असलेल्या या प्रथेला तामसा वासी जोपासत आहे. तामसा सह परिसरात ग्रामीण भागातून ज्वारी ची भाकरी बनवून या मंदिर ला अर्पण केल्याजते आणि रानमेवा, फळ फुल, कंदमूळ, बोरं, भाजीपत्ते च्या मिश्रण करून दोन ते तीन विशाल कढाईत भाजी शिजवल्या जाते आणि रांगेत उभं राहून हाथात दोन भाकरी भाजी.वितरण केलं जाते.

या महाप्रसाद घेण्यासाठी लाखो च्या संख्येने भाविक येतात.. विशेषतः या भाजीभाकर पंगतीत मुस्लिम, बोद्ध, भाविक सुद्धा या भाजीभाकर महाप्रसादेत आपलं आर्थिक, शारीरिक सहभाग नोंदविता. सर्वधर्म स्वभाव च्या एकात्मितेच दर्शय पाहायला मिळतो.

# अबकॅस स्पर्धेत इन्सपायर अकॅडमी कंधारचे विद्यार्थी चमकले

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

येथील कै.दिगू पाटील लुंगारे सभागृह, सिद्धार्थ नगर कंधार येथे इन्सपायर अबकॅस अकॅडमी पुणे शाखेच्या सचिव सौ. सत्यशीला भद्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात इन्सपायर अबकॅस अकॅडमी पुणे संचलित सिद्धार्थ नगर कंधार शाखेचे विद्यार्थी नॅशनल लेवल स्पर्धेत चमकले असल्याने अकॅडमीच्या वतीने गुण गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अधक्ष्या चित्राताई लुंगारे होत्या तर उद्घाटक म्हणून महेश कागणे हे होते प्रमुख उपस्थिती चालीकवार मॅडम, अनावडे मॅडम हे होत्या. इन्सपायर अबकॅस अकॅडमी पुणे संचलित सिद्धार्थ नगर कंधार येथील शाखेच्या विद्यार्थीनी नॅशनल लेवल स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले.गेल्या काही वर्षामध्ये गणिताची आकडेमोड बौद्धिक गणित व अबकॅसच्या माध्यमातून होत असून या उपकरणाद्वारे विद्यार्थ्यांना प्राथमिक प्रशिक्षण दिले जाते.




सनराईज अबकॅस अकॅडमी सिद्धार्थ नगर कंधारच्या संचालिका सौ.स्वाती विशाल कदम यांचे नॅशनल लेव्हल स्पर्धेत विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन आणि नियोजन बध्द अभ्यास करून घेतल्याबद्दल या भरारीला त्यांचं मोठं योगदान असल्याने इन्सपायर अबकॅस अकॅडमी पुणे यांच्या वतीने सचिव सौ.सत्यशीला भद्रे यांच्या हस्ते सौ.स्वाती विशाल कदम यांना "उत्कृष्ट शिक्षिका" पारितोषक प्रदान करण्यात आले. अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय पारितोषक जिंकून यशाची उज्वल परंपरा कायम राखली. सर्व यशस्वी विध्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्यातील विशेष रँक मध्ये उत्तीर्ण विद्यार्थी रँक-1श्रेया राहुल कांबळे,कार्तिक नितीन एंगडे, श्रीशा अनिल कांबळे, श्रुती राहुल कांबळे, रँक-2 महर्ष सिद्धार्थ सोनकांबळे, सम्यक सचिन बनसोडे, रँक-4 नक्षत्रा विशाल कदम, माहिरा सतीश वाघमारे , प्राची प्रविण राठोड, रँक-5 स्मितांश मयूर कांबळे,रँक-9 सार्थक रत्नपाल ढवळे, रिषभ शशिकांत दासरे, मनस्वी विशाल कदम, स्वयम मयूर कांबळे, सिद्धांत संतोष कांबळे, आरोही बाबुराव गवळे, सक्षम निलेश गायकवाड आदी विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. या यशस्वी विद्यार्थ्यां आणि संचालिका सौ.स्वाती कदम मॅडमचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# दोन पोलीस अंमलदार निलंबित

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील शहराचे आमदार संग्राम जगताप यांना सुरक्षा देणारे दोन पोलीस बॉडीगार्ड कर्तव्यात कसूर व शस्त्र हाताळण्यात हलगर्जीपणा केल्याप्रकरणी निलंबित करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी याबाबतचे आदेश काढले असून, नीलेश भालसिंग व राघवेंद्र भालसिंग अशी निलंबित करण्यात आलेल्या पोलीस अंमलदारांची नावे आहेत. या दोन्ही पोलीस अंमलदारांवर कर्तव्याचे ठिकाण सोडून बोल्हेगाव परिसरात जाणे तसेच जवळील रिव्हॉल्वर चुकीच्या व हलगर्जी पध्दतीने हाताळल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात तणावपूर्ण वातावरण असताना, अशा प्रकारे शस्त्राचा गैरवापर किंवा निष्काळजीपणा केल्याचा आरोप गंभीर मानण्यात आला आहे.

# वाहतूक अंमलदारांची वैद्यकीय तपासणी व सीपीआर प्रशिक्षण!

## रस्ता सुरक्षा महिन्यानिमित्त खारघर वाहतूक शाखेचा उपक्रम




**खारघर : (समर्थ गांवकरी)**

रस्ता सुरक्षा महिन्याच्या अनुषंगाने खारघर वाहतूक शाखेच्या वतीने आज एक महत्त्वपूर्ण व उपयुक्त उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत खारघर वाहतूक शाखेत कार्यरत असलेल्या वाहतूक अंमलदारांची सविस्तर वैद्यकीय तपासणी करण्यात आली. यासोबतच आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले सीपीआर (CPR) प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. रस्त्यावर अपघात झाल्यानंतर पहिल्या काही मिनिटांत योग्य व तात्काळ उपचार मिळणे अत्यंत आवश्यक असते. याच उद्देशाने वाहतूक अंमलदारांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देऊन अधिक सक्षम करण्यात आले. या प्रशिक्षणामुळे अपघातग्रस्तांना त्वरित मदत मिळण्यास मोठी मदत होणार असून, रस्ता सुरक्षेला अधिक बळ मिळणार आहे. रस्ता सुरक्षा ही केवळ नियमांची पूर्तता नसून ती प्रत्येकाच्या जीवाशी निगडित असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. वाहतूक विभागाच्या या उपक्रमामुळे नागरिकांमध्येही रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता वाढण्यास हातभार लागणार आहे.

# अपहरण झालेल्या १०० मुलींचा दोन वर्षात शोध

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राहुरी पोलिसांनी 'ऑपरेशन मुस्कान'अंतर्गत गेल्या दोन वर्षात १०० मुलींचा शोध घेऊन त्यांना पुन्हा पालकांच्या ताब्यात देण्यात आले. या मोहिमेत गेल्या ९ वर्षात अपहरण झालेल्या मुलींचा शोध लागलेला आहे. यातील बहुतांश घटनांमध्ये अल्पवयीन मुलींना विविध प्रकारचे आमिष दाखवून त्यांचे अपहरण केल्याचे पोलिसांना आढळले आहे. राहुरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक संजय ठेंगे यांनी ही माहिती दिली. या सर्व गुन्ह्यांमध्ये आत्तापर्यंत मुख्य आरोपीसह अपहरणास वेगवेगळ्या प्रकारे मदत करणारे, उदाहरणार्थ वाहन उपलब्ध करणारे, अत्याचार करण्यासाठी हॉटेल, लॉजची खोली उपलब्ध करणारे, मुलांचे आई-वडील, नातेवाईक, मित्र-मैत्रिणी अशा मुख्य ९५ आरोपी व त्यांना सहाय्य करणारे १७ महिला व व पुरुषांना आरोपी करून त्यांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये आरोपीचा मित्र असलेल्या एका गृहरक्षक दलाच्या जवानाचाही समावेश आहे. राहुरी तालुक्यात ९६ गावे व दोन नगरपालिका आहेत. जानेवारी २०२४ मध्ये एकाच महिन्यात ६ मुलींचे अपहरण झाल्याचे गुन्हे दाखल झाले. मात्र एकाही मुलीचा शोध लागला नाही. त्यामुळे पोलीस निरीक्षक ठेंगे यांनी मागील काही वर्षातील अपहरण झालेल्या परंतु शोध न लागलेल्या मुलींचा माहिती घेतली. त्यानंतर 'ऑपरेशन मुस्कान' अंतर्गत प्राधान्याने मुलींचा शोध घेण्याचे आदेश दिले. त्याच्यासाठी स्वतंत्र पथक तयार केले. याचाच परिणाम म्हणून गेल्या दोन वर्षात १०० अपहृत मुलींचा शोध घेऊन त्यांना पालकांच्या ताब्यात देण्यात राहुरी पोलिसांनी यश आले.

# भव्य महिला सन्मान सोहळा व मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न!

**छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)**

सबला उत्कर्ष फाउंडेशन, मीरा नगर पडेगाव (छत्रपती संभाजीनगर) यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिला सन्मान सोहळा व महिला आरोग्य हेल्थ चेकअप कॅम्प पडेगाव येथे उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. तस्किन शेख (जिल्हा हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर) तसेच योजना चव्हाण (घाटी हॉस्पिटल – वैद्यकीय क्षेत्र) उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

कार्यक्रमात सबला उत्कर्ष फाउंडेशनच्या अध्यक्षा राजश्री चौधरी, उपाध्यक्ष जागृती चौधरी व सहसचिव राहुल श्री परदेशी यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.



यावेळी बोलताना डॉ. तस्किन शेख म्हणाल्या, “क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त या सामाजिक उपक्रमात सहभागी होण्याचा मला विशेष आनंद आहे. महिलांच्या आरोग्यविषयक कोणत्याही गरजेसाठी मी सदैव मदतीस तयार आहे.”

फाउंडेशनच्या अध्यक्षा राजश्री चौधरी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, “भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका आणि महिला शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांनी समाजातील महिला व वंचित घटकांना शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम केले. आज आपण शिक्षित आहोत, हे त्यांच्या कार्यामुळेच. या प्रेरणेतूनच हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला.”

या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्त्या, शिक्षिका, महिला बचत गट सदस्य, आशा वर्कर्स, ब्युटीशियन, वैद्यकीय, न्याय, आर्मी व सामाजिक क्षेत्रातील महिलांचा सन्मान करण्यात आला. पोलीस कर्मचारी निवडणूक ड्युटीवर असल्याने त्यांचा सन्मान त्यांच्या कार्यस्थळी जाऊन करण्यात आला.



सन्मानितांमध्ये राधा प्रकाश धनवई, दिपाली दिलीप अंभोरे, माधुरी लहू नरवडे, नंदिनी पवन धनवे, मीरा बोरडे, सविता जीवन पंडित, फेस खान, राहुल श्री परदेशी, भाऊराव निकाळे, भानुदास सनांसे (निवृत्त आर्मी अधिकारी), तसेच लिटील एंजल स्कूल मीरा नगर येथील शिक्षिका पुनम चव्हाण, शितल बरडे, दिपाली काकडे आणि अनेक आशा वर्कर्स यांचा समावेश होता.

पोलीस विभागातून अशोक जाधव, संभाजी गोरे (PSI), नवनाथ गायकवाड (पोलीस निरीक्षक), एन. बन्सवाल (API) यांच्यासह ट्रॅफिक पोलिसांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष खरात (सामाजिक कार्यकर्ते) यांनी केले. कार्यक्रमानंतर डॉ. तस्किन शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व महिलांचे मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले व आवश्यक औषधे देण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल अध्यक्षा राजश्री चौधरी यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

# वृद्धेश्वर अर्बन व चैतन्य उपक्रमांनी सहकाराला नवी दिशा

■ महिला सक्षमीकरण व शेतकरी हिताच्या कार्याने बिहारची अभ्यास समिती भारावली

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)



सहकारी क्षेत्रातील एका मित्राला आजारपणाच्या उपचारासाठी खर्चाअभावी जीव गमवावा लागल्याची खंत मनात ठेवून सुरू झालेला वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचा प्रवास आणि त्यातून उभे राहिलेले चैतन्य उपक्रम गेल्या दहा वर्षांत महिला बचत गट, छोटे व्यावसायिक व शेतकऱ्यांसाठी आशेचे केंद्र ठरले आहेत. संस्थापक चेअरमन विठ्ठलराव वाडगे व त्यांच्या कुटुंबीयांनी निःस्वार्थ भावनेतून उभारलेला हा प्रवास थक्क करणारा असून सहकार क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना नवी ऊर्जा देणारा आहे, असे गौरवोद्गार बिहार राज्यातील मुंगेर जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या अभ्यास समितीचे सदस्य कपिलदेव शर्मा यांनी काढले. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी संस्थेचे सहाय्यक प्राध्यापक प्रा. ऋषिकेश कळमकर यांच्या नेतृत्वाखाली बिहार राज्यातील विविध सहकारी संस्थांच्या नऊ अध्यक्षांची अभ्यास समिती मंगळवारी श्रीगोंदा येथील वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटी, पारगाव फाटा येथील चैतन्य बाजार समिती तसेच अहिल्यानगर येथील चैतन्य महिला बचत गटांची सहकारी पतसंस्था यांना भेट देण्यासाठी आली होती. यावेळी शर्मा बोलत होते.

बिहार राज्यात सहकाराच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे उपक्रम राबविले जात असून या क्षेत्रात महाराष्ट्राने उल्लेखनीय यश मिळविले आहे. त्या अनुभवाचा लाभ बिहारमधील सहकार चळवळीला व्हावा, या उद्देशाने वृद्धेश्वर अर्बन सोसायटी व चैतन्य बाजार समितीची अभ्यासासाठी निवड करण्यात आल्याचे शर्मा यांनी सांगितले. विठ्ठलराव वाडगे यांनी निःस्वार्थ हेतूने उभारलेले कार्य आम्ही आमच्या भागात अनुकरणीय स्वरूपात राबवू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रा. ऋषिकेश कळमकर यांनी वृद्धेश्वर अर्बन सोसायटीचे कार्य नाशिक येथील नामांकित संस्थांच्या धर्तीवर उत्कृष्ट असल्याचे नमूद करत, या मॉडेलमधून अल्पावधीत महिला सक्षमीकरण व शेतकरी हिताचे उपक्रम प्रभावीपणे राबविता येतील, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी सौ. सायली वाडगे व सौ. मेघना गावडे यांनी महिला बचत गटांची स्थापना, महिलांसाठी प्रशिक्षण वर्ग, आदिवासी मच्छीमार समाजासाठी राबविण्यात आलेल्या योजना, गृहउद्योगातून आलेली आर्थिक समृद्धी तसेच कर्जवसुलीबाबत सविस्तर माहिती दिली. समितीने चैतन्य बाजार समितीला भेट देत शुभम वाडगे यांच्याशी चर्चा केली. तेथील मालाचे वजन, लिलाव प्रक्रिया, लिलावानंतर तातडीने दिली जाणारी रक्कम तसेच महानगरांच्या धर्तीवर राबविण्यात येणाऱ्या बोली पद्धतीची माहिती घेतली.

# गिरिश गायकवाड यांची ३४ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्ती

■ सेवापूर्ती सोहळा संपन्न

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)



श्रीगोंदा येथील महसूल विभागातील कर्तव्यनिष्ठ मंडळाधिकारी गिरिश गायकवाड यांनी ३४ वर्षांची प्रदीर्घ शासकीय सेवा पूर्ण करून ३१ डिसेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्ती स्वीकारली. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित सेवापूर्ती सोहळ्यात प्रांताधिकारी श्रीकुमार चिंचकर, तहसीलदार सचिन डोंगरे व नायब तहसीलदार मिलिंद जाधव यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

गिरिश गायकवाड यांनी ६ जून १९९१ रोजी नगर तहसील कार्यालयात नक्कलनवीस म्हणून शासकीय सेवेत पदार्पण केले. सन २००२ मध्ये शासन निर्णयानुसार त्यांची वर्ग-३ लिपिक पदावर नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांनी लिपिक, पुरवठा निरीक्षक, गोदाम व्यवस्थापक, मंडळ अधिकारी आदी विविध पदांवर कार्यरत राहून शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविल्या.

सेवाकाळात लोकाभिमुख दृष्टिकोन ठेवून कार्य करत त्यांनी अनेक गरजू नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला. नगर व श्रीगोंदा तालुक्यात कार्यरत असताना लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांचे त्यांना मोलाचे सहकार्य लाभले.

तसेच कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आणि महसूल कर्मचारी संघटनेचे नाशिक विभागीय सरचिटणीस म्हणून कार्यरत राहून कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

सेवानिवृत्तीनिमित्त गिरिश गायकवाड यांनी सर्व वरिष्ठ अधिकारी, सहकारी कर्मचारी, लोकप्रतिनिधी, पत्रकार बांधव व मित्रपरिवाराचे आभार व्यक्त केले.

# ‘मोबाईलचे दुष्परिणाम’ गीत ठरले नंबर वन



श्रीगोंदा: (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संपन्न झालेल्या तालुकास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत वेळू येथील सांगळे वस्ती शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले ‘मोबाईलचे दुष्परिणाम’ हे गीत प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले. या यशाबद्दल सांगळे वस्तीतील नागरिक व पालकांनी जल्लोष साजरा केला.

शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता मगर व शिक्षिका तनुजा शिंदे यांनी शाळेतील सुविधा आणि शैक्षणिक गुणवत्तेवर विशेष लक्ष दिल्यामुळे सांगळे वस्तीची शाळा हळूहळू ‘स्मार्ट स्कूल’ कडे वाटचाल करू लागली आहे.

नुकत्याच झालेल्या केंद्रस्तरीय स्पर्धांमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. हस्ताक्षर स्पर्धेत विद्या मारुती वडवकर (प्रथम), वेशभूषा स्पर्धेत श्रद्धा बाळासाहेब दातीर (प्रथम) व मयुरी हेमराज सांगळे (तृतीय), तर वक्तृत्व स्पर्धेत ऋतिका योगेश डेबरे (तृतीय) क्रमांकाने यश मिळवले.

“मी सांगळे–वेळूतील शाळेमुळे घडलो,” ही जाणीव ठेवत प्रा. केशव सांगळे यांनी सांगळे वस्ती शाळेला चार, वेळू शाळेला दोन आणि मुंजाबा वस्ती शाळेला दोन संगणक भेट देऊन संगणक शिक्षणासाठी प्रात्यक्षिक सुविधा उपलब्ध करून दिली. त्यामुळे शाळांमध्ये डिजिटल शिक्षणाला चालना मिळाली आहे.

पालक व माजी विद्यार्थी शाळेच्या परिवर्तनासाठी पुढे येऊ लागले असून गणेश वडवकर, नरेंद्र सांगळे, सतीश डेबरे व सचिन माने यांनी शाळेबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. या सर्व उपक्रमांचे गटविकास अधिकारी राणी फराटे, गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी, शिक्षण विस्तार अधिकारी सुनीता वाजे व केंद्रप्रमुख माणिक आढाव यांनी कौतुक केले.

# मोफत जयपूर फुट शिबीर

शिर्डी : (समर्थ गांवकरी)

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व श्री भगवान महावीर विकलांग सहाय्यता समिती (मुंबई–जयपूर) यांच्या संयुक्त विद्यमाने तब्बल दोन वर्षांनंतर लोकांच्या आग्रहास्तव पुन्हा एकदा मोफत कृत्रिम पाय रोपण (जयपूर फुट) शिबीर व गरजू दिव्यांगांसाठी सहाय्यक साहित्य वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर दि. १९ जानेवारी २०२६ ते दि. २२ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. शिबीरादरम्यान गरजू व लाभार्थी दिव्यांग व्यक्तींची तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात येऊन आवश्यकतेनुसार पायाचे मोजमाप घेऊन त्यांना योग्य आकाराचा कृत्रिम पाय बसविण्यात येणार आहे. तसेच जुन्या कृत्रिम पायांची दुरुस्ती देखील या शिबीरात पूर्णतः मोफत करण्यात येणार आहे.

# रोटरी क्लब ऑफ नाशिककडून पत्रकार सुनील गिते सन्मानीत!

अकोले : (समर्थ गांवकरी)



रोटरी क्लब ऑफ नाशिक च्या वतीने दर्पण कार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार दिनी ज्येष्ठ पत्रकार सुनील गीते यांना सन्मानित करण्यात आले सकाळचे माजी संपादक व ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले

दैनिक सकाळ उत्तर महाराष्ट्र आवृत्तीचे संपादक अभय सुपेकर, रोटरी क्लब ऑफ नाशिक चे अध्यक्ष डॉ. गौरव सामनेरकर, मानद सचिव रो. रेखा पटवर्धन, प्रकल्प सचिव रो. मकरंद चिंधडे, जनसंपर्क संचालक एडवोकेट रो. विद्युलता तातेड पुरस्कार निवड समिती अध्यक्ष डॉ. संतोष साबळे, आदींसह रोटरी क्लबचे सदस्य व अनेक मान्यवर उपस्थित होते

पत्रकार सुनील गीते हे 1991 पासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत ,दैनिक सार्वमत, दैनिक लोकमत, दैनिक केसरी, या दैनिकांत त्यांनी काम केले दैनिक लोकमंथन या दैनिकांत अनेक वर्ष ते काम करत आहेत महादर्पण न्यूज या डिजिटल न्यू पोर्टलचे ते संपादक आहेत पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या दीर्घ कामाची दखल घेत रोटरी क्लब ऑफ नाशिक ने त्यांना दर्पन दिनी सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले

रोटरी क्लब ऑफ नाशिक च्या वतीने श्री. उत्तम कांबळे यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर जीवन गौरव पुरस्काराने ज्येष्ठ संपादक अभय सुपेकर यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. तसेच यावेळी ‘सकाळ’चे वरिष्ठ बातमीदार अरुण मलानी, ‘अॅग्रोवन’चे बातमीदार मुकुंद पिंगळे, दैनिक भास्करचे सोमनाथ कोठुळे, छायाचित्रकार अमित शिंदे, भ्रमरचे हितेश शहा, पुढारीचे आसिफ सय्यद, लोकमत टाइम्सचे आकाश खांडके, समर्थ गावकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, महाराष्ट्र टाइम्सच्या गायत्री जेऊघाले, देशदूतचे भरत पगारे, दैनिक लोकमंथनचे तालुका प्रतिनिधी व महादर्पण डिजिटल पोर्टलचे संपादक सुनील गीते, गावकरीचे मुकुंद बाविस्कर, दिशा न्युजचे मनोहर गायकवाड यांचा सन्मान करण्यात आला.

# समाजाला दिशा देण्यात पत्रकारांचे मोठे योगदान – अमिनभाई शेख

श्रीगोंदा तालुका :(समर्थ गांवकरी)




“पत्रकारिता ही लोकशाहीचा कणा आहे. पत्रकारितेकडे केवळ एखाद्या संस्थेतील नोकरी म्हणून न पाहता समाजातील समस्या मांडण्याचे प्रभावी माध्यम म्हणून पाहिले पाहिजे. समाजाला योग्य दिशा देण्यात पत्रकारांचे मोठे योगदान आहे,” असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार अमिनभाई शेख यांनी पत्रकार दिनानिमित्त बोलताना केले.

दि. ६ जानेवारी रोजी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त श्रीगोंदा येथील कुकडी विश्रामगृह येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम जिल्हाध्यक्ष दत्ता पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून करण्यात आली.

## पत्रकार दिनानिमित्त विविध ठिकाणी सन्मान

पत्रकार दिनानिमित्त माजी मंत्री बबनराव पाचपुते, श्रीगोंदा शहराच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस, श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे, बेलवंडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर, सार्वजनिक बांधकाम खात्याचे शाखा अभियंता होके आदींच्या हस्ते विविध ठिकाणी पत्रकार बांधवांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दैनिक सिटीझनचे संपादक तथा ज्येष्ठ पत्रकार अमिनभाई शेख होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नवनिर्वाचित नगरसेविका मिराताई शिंदे, प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष सुरेशमामा सुपेकर, उद्योजक अॅड. प्रदीप खामगळ, संतोष पानसरे आदी मान्यवर उपस्थित होते. पत्रकार दिनानिमित्त ज्येष्ठ पत्रकार अमिनभाई शेख, सुनील कारंजकर व रमेश गांधी यांचा संघटनेच्या वतीने शाल, श्रीफळ व फेटा बांधून सन्मान करण्यात आला. यावेळी नवनिर्वाचित नगरसेविका मिराताई शिंदे, पत्रकार अंकुश शिंदे व आप्पा चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमानंतर जिल्हाध्यक्ष दत्ता पाचपुते यांच्या हस्ते नगरसेविका मिराताई शिंदे व उपस्थित पत्रकारांना मिठाईसह विविध साहित्यांचे वाटप करून सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे आजी-माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच तालुक्यातील विविध दैनिकांचे व डिजिटल माध्यमांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पिटर रणसिंग यांनी केले. सूत्रसंचालन केशव कातोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन जिल्हाध्यक्ष दत्ता पाचपुते यांनी केले.



ठाणे : दिव्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून प्रभाग २८ मध्ये योगेश निकम, ज्योती राजकांत पाटील आणि अॅड. रोहिदास बामा मुंडे हे नगरसेवक पदाच्या निवडणुकीसाठी रिंगणात उभे आहेत. त्यांची लढाई थेट शिंदे गटाच्या उमेदवारांबरोबर असून प्रभाग २८ मध्ये शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवारांचा प्रचार जोमाने सुरू असून उमेदवार असलेले योगेश निकम, अॅड.रोहिदास मुंडे व ज्योती पाटील यांच्याकडे जनता आश्वासक चेहरा म्हणून पहात असल्याचे राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

(फोटो - संतोष पडवळ)

# सिकलसेल अॅनिमिया : ओळख, प्रतिबंध आणि निर्मूलनाकडे वाटचाल

■ संजय प्रभाकर जाधव ■

जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी

जिल्हा परिषद ठाणे, आरोग्य विभाग

## सिकलसेल विशेष मोहीम | १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६

(समर्थ गांवकरी)

सिकलसेल अॅनिमिया हा एक गंभीर, दीर्घकालीन आणि अनुवंशिक रक्तविकार असून तो केवळ वैयक्तिक आरोग्याचा प्रश्न नसून एक व्यापक सामाजिक आणि सार्वजनिक आरोग्य समस्या आहे. योग्य वेळी निदान, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि व्यापक जनजागृतीच्या माध्यमातून या आजारावर नियंत्रण मिळवणे शक्य आहे. याच उद्देशाने भारत सरकारने सन २०४७ पर्यंत सिकलसेल मुक्त भारत घडवण्याचे ध्येय निश्चित केले असून, त्याच अनुषंगाने महाराष्ट्र शासनामार्फत १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत सिकलसेल तपासणी विशेष अभियान पंधरवडा राबविण्यात येत आहे.

सिकलसेल आजाराचे स्वरूप आणि महाराष्ट्रातील स्थिती

सामान्य परिस्थितीत लाल रक्तपेशी गोलाकार व लवचिक असतात. त्या रक्तवाहिन्यांमधून सहज प्रवास करून शरीराच्या प्रत्येक भागाला ऑक्सिजन पोहोचवतात. मात्र सिकलसेल अॅनिमियामध्ये या पेशी चंद्रकोरीसारख्या (विळ्याच्या) आकाराच्या, कडक व चिकट बनतात. परिणामी या पेशी रक्तवाहिन्यांमध्ये अडकून ऑक्सिजनचा प्रवाह अडवतात आणि वेदनादायक व जीवघेण्या गुंतागुंती निर्माण होतात.

भारतामध्ये सिकलसेल रुग्णसंख्येत जगात दुसरा क्रमांक असून सुमारे १ कोटी ८० लाख लोकांमध्ये सिकलसेलची लक्षणे, तर १४ लाखांहून अधिक लोक प्रत्यक्ष रुग्ण आहेत. महाराष्ट्रात ही स्थिती काहीशी गंभीर असून देशातील सुमारे १५ टक्क्यांहून अधिक सिकलसेल रुग्ण राज्यात आढळतात. २०१९ ते २०२५ या कालावधीत राज्यात १२,४२० सिकलसेल रुग्ण आणि १,२४,२७५ वाहक (Carrier) आढळून आले आहेत.

ठाणे जिल्ह्यात २०२१ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत ४,५३,४०३ व्यक्तींची तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये १,०३५ वाहक व ३७ रुग्ण आढळले आहेत. २००९ पासून आजअखेर जिल्ह्यात एकूण ११४ सिकलसेलग्रस्त रुग्ण नोंदविण्यात आले आहेत. प्रामुख्याने आदिवासी समाज व काही विशिष्ट समुदायांमध्ये या आजाराचे प्रमाण अधिक आढळते.

अनुवंशिकता आणि विवाहपूर्व तपासणीचे महत्त्व

सिकलसेल हा आजार संसर्गजन्य नसून अनुवंशिक आहे. म्हणजेच तो पालकांकडून मुलांमध्ये जनुकांद्वारे येतो. विशेषतः रक्तसंबंधीय विवाह (चुलत-मामे भावंडांतील विवाह) या आजाराच्या प्रसाराला कारणीभूत ठरतात.

सिकलसेलचे दोन प्रकार आहेत –

वाहक (AS) – स्वतः निरोगी, पण पुढील पिढीला आजार देऊ शकतात

रुग्ण (SS) – गंभीर लक्षणांनी ग्रस्त




जर दोन्ही पालक वाहक असतील, तर अपत्य सिकलसेल रुग्ण होण्याची शक्यता २५ टक्के असते. त्यामुळे विवाहापूर्वी सिकलसेल तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. शासनामार्फत पांढरे (निरोगी), पिवळे (वाहक) आणि लाल (रुग्ण) अशी रंगीत कार्ड प्रणाली सुरू करण्यात आली आहे.

बालकांमधील लक्षणे आणि वाढीवरील परिणाम

सिकलसेलची लक्षणे सहसा बाळ ६ महिन्यांच्या बाळाला सुद्धा दिसू शकतात. हात-पायांच्या बोटांना सूज येणे, तीव्र वेदना, सतत थकवा, वजन न वाढणे, वारंवार संसर्ग होणे ही प्रमुख लक्षणे आहेत. न्यूमोनिया, मेनिंजायटीस यांसारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. वेळेवर रक्त तपासणी (HPLC / Electrophoresis) केल्यास योग्य उपचार शक्य होतात.

‘सिकलसेल क्रायसिस’ ही या आजारातील सर्वात धोकादायक अवस्था आहे. रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा आल्याने छाती, हाडे, पाठ, सांधे यामध्ये तीव्र वेदना होतात. याचा परिणाम –

- मेंदू : लहान वयात स्ट्रोक
- फुफ्फुसे : अॅक्यूट चेस्ट सिंड्रोम
- मूत्रपिंड, डोळे, यकृत, पित्ताशय यांवर गंभीर परिणाम वारंवार क्रायसिस झाल्यास मृत्यूचा धोका संभवतो.

भारत सरकारचे उद्दिष्ट २०४७ पर्यंत सिकलसेल निर्मूलन हे आहे. त्यासाठी देशभर ७ कोटी लोकांचे स्क्रीनिंग केले जाणार आहे. महाराष्ट्रातील २१ जिल्ह्यांमध्ये हे अभियान प्रभावीपणे राबवले जात आहे.

१५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या सिकलसेल तपासणी विशेष पंधरवड्यात मोफत तपासणी, औषधोपचार, समुपदेशन, गरोदर मातांची विशेष तपासणी या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सिकलसेलवर कायमस्वरूपी इलाज नसला, तरी हायड्रॉक्स्युरिया हे प्रभावी औषध आहे.

यामुळे वेदनादायक झटके ५०% पर्यंत कमी होतात. फॉलिक अॅसिड, आवश्यकतेनुसार रक्त संक्रमण आणि नियमित वैद्यकीय देखरेख महत्त्वाची आहे. बनावट उपचारांपासून दूर राहणे आवश्यक आहे.

लवकर निदान हेच प्रभावी नियंत्रणाचे साधन आहे. तपासणीनंतर समुपदेशन अत्यावश्यक असून, योग्य विवाह निर्णय व गर्भधारणेतील काळजी यामुळे पुढील पिढी वाचवता येते.

भरपूर पाणी पिणे, संतुलित आहार, अति उष्णता-थंडी टाळणे, हलका व्यायाम, धूम्रपान टाळणे आणि सकारात्मक मानसिकता या गोष्टी रुग्णांचे जीवनमान सुधारतात.

महाराष्ट्र शासनामार्फत संजय गांधी निराधार योजना, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सवलती, एसटी प्रवास सवलत, विविध सामाजिक व आरोग्य योजना राबविण्यात येत आहेत.

सिकलसेल निर्मूलन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

तपासणी करून घेणे, जनजागृती करणे आणि योग्य निर्णय घेणे हेच सिकलसेलमुक्त भारताकडे जाण्याचे खरे पाऊल आहे.

चला, सिकलसेल निर्मूलनाच्या या राष्ट्रीय मोहिमेत आपण सर्वजण सहभागी होऊया.

आज तपासणी – उद्याचे निरोगी भविष्य!

# 15व्या वित्त मधील दर्जाहीन व निकृष्ट झालेल्या सर्व कामाची



**तामसा : (समर्थ गांवकरी)**

ग्रामपंचायत लिंगापूर अंतर्गत पंधराव्या वित्त आयोगातून अनेक नियमबाह्य कामे झाले असून, 15 व्या वित्त आयोगातून ग्रामपंचायतीने नाली बांधकाम केले असून सदर नालीचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असून कुठलेही चांगल्या प्रकारची सिमेंट, गज, वाळू न वापरता व खाली कुठलेही बेड न करता त्यांनी सदर नालीचे काम केले आहे. थातूरमातूर काम करून ग्रामपंचायतची कालावधी संपत असल्यामुळे बिल उचलून घेण्याचा प्रकार सरपंच व ग्रामसेवक करत आहेत. या कामाची सविस्तर पाहणी, चौकशी करण्यात यावी व निकृष्ट व दर्जाहीन झालेल्या संबंधित कामाची बिले देण्यात येऊ नये, अशी मागणी हदगावचे गटविकास अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत सदस्या सौ. इंदुबाई सुरेश कवडे यांनी केली आहे.

लिंगापूर ग्रामपंचायत अंतर्गत नांदेड जिल्हा परिषदच्या दलित वस्ती अंतर्गत सिमेंट रस्त्यासाठी दलित वस्तीमध्ये रस्ता मंजूर होऊनही गावातील सरपंच व ग्रामसेवक यांनी मनमानी करून हा केवळ एक बाजूने दलित वस्ती असून गावातील मुख्य रस्तावर त्यांना हा रस्ता केला, त्यामुळे दलित वस्ती मधले सर्व रस्ते ठेवले आहे, हा दलित समाजावर झालेला अन्याय आहे, मी याबाबत सरपंच व ग्रामसेवक यांना वेळोवेळी कामाबाबत सांगूनही त्यांनी दखल घेतली नाही. पंचायत समिती स्तरावरून झालेल्या दोन्ही कामाची योग्य ती चौकशी करावी व संबंधित ग्रामसेवक व सरपंच मनमानी करून व सत्तेचा दुरुपयोग करून जी दर्जाहीन कामे केली आहेत, ती कामे तात्काळ थांबवावी या कामाची चौकशीविना मोजमाप करू नये किंवा देयके देण्याचा प्रकार पंचायत समितीच्या कार्यालयाकडून झाला तर येणाऱ्या 26 जानेवारी रोजी आमरण उपोषण करण्यात येईल, अशा इशारा देत निवेदनाची प्रतिलिपी राज्यसभेचे खासदार तथा माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, आमदार बाबुराव कदम कोहळीकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली, भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांना प्रतिलिपी करत संबंधित कामाची चौकशी करत शासनाचा निधीचा दुरुपयोग करणाऱ्या यंत्रणेवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी ग्रामपंचायत सदस्या इंदुबाई कवडे यांनी केली आहे.



ठाणे : दिवा प्रभाग क्र. 27 मधून ठाकरे शिवसेनेचे उमेदवार सचिन राम पाटील व नीलम चेतन पाटील यांच्या प्रचाराला प्रभागातील नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला असून दिवा विभागातील पाणी टंचाई, मूलभूत गरजा व महीलांचे सुरक्षेच्या दृष्टीने प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्नशिल असू असे सचिन पाटील यांनी स्पष्ट केले आहे. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश संघटक भरत काकडे यांचा भाजपात प्रवेश

नवीन नांदेड (स. गांवकरी) : कौठा येथील नेहमी सामाजिक चळवळीत अग्रेसर असणारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ओबीसी प्रदेश संघटक भरत काकडे यांनी.माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपा पक्षात प्रवेश केला. मनपा प्रभाग क्रमांक 19 मधील भाजपा पक्षाच्या उमेदवारांचा प्रचारासाठी 7 जानेवारी रोजी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी गंगाप्रसाद काकडे यांच्या निवासस्थानी आले असता. यावेळी खासदार अजित गोपछडे, माजी जि.प.गंगाप्रसाद काकडे,माजी नगरसेवक राजू पाटील काळे, शितल खांडेल,यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटक भरत काकडे यांनी भाजपा पक्षात प्रवेश केला यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. जुना कौठा,असरजन,धुमाळवाडी,वसरणी येथे खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत बैठका घेण्यात आल्या यावेळी विविध ठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले होते.



### स्वारातीम विद्यापीठ परिसरात स्वच्छता शिबीर उत्साहात संपन्न

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय निर्देशालय, पुणे तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ परिसरात एकदिवसीय स्वच्छता शिबीर उत्साहात संपन्न झाले. या शिबिरास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, विज्ञान व तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. मारुती गायकवाड, कार्यक्रमाधिकारी डॉ. सुहास पाठक व प्रा. अभय वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिराची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी "स्वच्छता ही केवळ मोहिम नसून ती आपल्या दैनंदिन जीवनाची सवय बनली पाहिजे. स्वच्छ परिसरातूनच सुदृढ समाज आणि सशक्त राष्ट्राची निर्मिती होते," असे प्रतिपादन केले. तसेच विद्यार्थ्यांनी स्वच्छतेबरोबरच पर्यावरण संरक्षण व सामाजिक जबाबदारी जपावी, असे आवाहन त्यांनी केले. या स्वच्छता मोहिमेत राष्ट्रीय सेवा योजनेचे शंभरहून अधिक स्वयंसेवक विद्यार्थी, तसेच विद्यापीठातील संविधानिक अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी वर्गाने सक्रिय सहभाग घेत विद्यापीठ परिसरातील रस्ते, मोकळी मैदाने व ओसाड जागांची स्वच्छता केली. यामध्ये सुमारे १५० किलो प्लास्टिक कचरा संकलित करण्यात आला. यावेळी वृक्ष संवर्धनासाठी आळे तयार करणे, रस्त्यांची स्वच्छता तसेच ओसाड जागांचे व्यवस्थापन यावर विशेष भर देण्यात आला.

# दिव्यात प्रभाग २८ मधून शिंदे शिवसेनेचे पारडे जड

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिवा शहरातील राजकीय वातावरणात प्रचाराचे ढग जमू लागले आहे. प्रभाग क्रमांक २८ मधील शिवसेनेचे शहरप्रमुख व माजी नगरसेवक रमाकांत मढवी, माजी नगरसेविका दर्शना चरणदास म्हात्रे, माजी नगरसेवक दीपक जाधव व कु. साक्षी रमाकांत मढवी हे मोठ्या मताधिक्याने विजयी होतील असा ठाम विश्वास प्रभागात शिंदे शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच मतदार वर्गात दिसून येत आहे. प्रचारा दरम्यान स्थानिक नागरिकांशी संवाद साधताना केलेल्या कामाची पोहचपावती असेल व दिवेकरांची देखील हीच भावना आहे हे मा. उपमहापौर रमाकांत मढवी यांनी स्पष्ट केले.



**साक्षी मढवी कमी वयाच्या उमेदवार**

दिवा प्रभाग क्र २८ मधील यंदाच्या साक्षी मढवी या कमी वयाच्या उमेदवार असून त्यांनी अनेक शैक्षणिक व महिलांसाठी उपक्रम राबविले असून वडिलांच्या पावलावर पाऊल ठेऊन समाज व राजकारणात उडी घेतल्याने त्यांना त्यांच्या कामाची पोहचपावती मिळेल असे दिसून येत आहे. दिवा शहरातील अनेक विकास कामे व प्रश्न मार्गी लागले आहे. दिवेकर जनतेच्या अडीअडचणीला धावून जाणारे व सर्व सामान्यांसाठी सदैव तत्पर असलेले सर्व उमेदवार म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. याच कामाची पावती म्हणून आज सर्वसामान्य नागरिक स्वतःहून त्यांच्या प्रचारासाठी रस्त्यावर उतरताना दिसत आहेत. दिव्यातील अनेक रस्त्यांचे काँक्रीटीकरण पूर्ण केले असून दिवा शहर पाणीटंचाईतून मुक्त करण्यासाठी नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम युद्धपातळीवर केले आहे. दिवा शहरासाठी अनेक नवनवीन योजना प्रलंबित असून लवकरच त्या मार्गी लागतील असे उमेदवार रमाकांत मढवी यांनी २८ प्रभागात काल प्रचारा दरम्यान सांगितले आहे.



# सतीश हानमंते यांची नायगाव तालुका अध्यक्षपदी निवड

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील बरबडा येथील सर्व सामान्य कुटुंबातील सतीश शिवाजी हानमंते यांची नायगाव तालुका अध्यक्ष निवड करण्यात आली भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने माजी सरपंच भास्कररावजी धर्माधिकारी यांच्या घरी माझी नव्यानेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अनु-जाती विभाग नायगाव तालुका अध्यक्षपदी निवड केली.

त्या अनुषंगाने भव्य सत्कार सोहळा बरबडा येथे मोठ्या जल्लोषाने आणि शेकडो गावकऱ्यांच्या उपस्थित संपन्न झाला.

या सत्कार सोहळ्याला सर्व जाती धर्मातून आलेल्या माझ्या जुने जाणते मार्गदर्शक मंडळी ,तमाम मित्र मंडळी व समस्त गावकरी बांधवांनी शुभेच्छा दिल्या आहे.

# शिंदे शिवसेनेच्या उमेदवारांचा प्रचाराचा धुरळा

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

दिवा प्रभागातील शिंदे शिवसेनेच्या उमेदवारांचा प्रचाराचा धुरळा दिसू लागला आहे. दिवा प्रभाग क्र २७ मधून उभे असलेले दिवेकर व कोकणी माणसांच्या प्रश्नाबाबत कायम जागरूक असणारे आणि नागरिकांच्या सोबत असणारे नेतृत्त्व असलेले उपशहर प्रमुख शैलेश मनोहर पाटील तसेच दीपाली उमेश भगत, स्नेहा अमर पाटील व दिवा रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष ऍड. आदेश भगत हे मोठ्या मताधिक्याने विजयी होतील असा ठाम विश्वास जेष्ठ शिवसैनिक ब्रम्हाशेठ पाटील यांनी व्यक्त केला आहे. प्रचारा दरम्यान स्थानिक नागरिकांशी संवाद साधताना केलेल्या कामाची पोहचपावती असेल व दिवेकरांची देखील हीच भावना आहे हे स्पष्ट केले. दिवा प्रभाग क्र २७ मधील आपल्या कार्यकाळात दिवा शहरातील अनेक कामे व प्रश्न मार्गी लागले आहे. दिवेकर जनतेच्या अडीअडचणीला धावून जाणारे व सर्व सामान्यांसाठी सदैव तत्पर असलेले सर्व उमेदवार म्हणून



त्यांची ओळख निर्माण झाली आहे. याच कामाची पावती म्हणून आज सर्वसामान्य नागरिक स्वतःहून त्यांच्या प्रचारासाठी रस्त्यावर उतरताना दिसत आहेत. दिव्यातील अनेक रस्त्यांचे काँक्रीटीकरण पूर्ण केले असून दिवा शहर पाणीटंचाईतून मुक्त करण्यासाठी नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम युद्धपातळीवर केले आहे. दिवा शहरासाठी अनेक नवनवीन योजना प्रलंबित असून लवकरच त्या मार्गी लागतील असे उमेदवार शैलेश मनोहर पाटील यांनी काल प्रचारा दरम्यान सांगितले आहे.

# श्री अय्यप्पा स्वामी दीक्षा पूर्ण करून दीक्षेधारी केरळकडे मार्गस्थ

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

आज किनवट शहर व परिसरातील शेकडो भाविकांनी श्री अय्यप्पा स्वामीची ४१ दिवसांची कठोर दीक्षा पूर्ण करून केरळ राज्यातील शबरीमला येथे दर्शनासाठी प्रस्थान केले आहे. मकर संक्रांतीनिमित्त शबरीमला येथे प्रगट होणाऱ्या दिव्य मकरज्योतीचे दर्शन घेऊन ही दीक्षा पूर्णत्वास नेली जाणार आहे.

या पार्श्वभूमीवर आज किनवट येथील श्री अय्यप्पा स्वामी मंदिर परिसरात सकाळपासूनच भक्तिमय वातावरण होते. येथे पारंपरिक इरुमुडी बांधण्याचा विधी पार पडला. त्यानंतर भाविकांसाठी भव्य महाप्रसाद भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मोठ्या संख्येने स्वामी व भाविकांनी सहभाग घेतला.



४१ दिवसांच्या या कठोर दीक्षाकाळात स्वामींना एकवेळचे भोजन — ज्याला भिक्षा असे संबोधले जाते — करावे लागते. गळ्यात तुळशीमाळ, अंगावर पूर्ण काळे वस्त्र, जमिनीवर चटईवर शयन, पायात कोणतेही पादत्राण न घालणे आणि अखंड नामस्मरण ही या दीक्षेची वैशिष्ट्ये आहेत. किनवट व परिसरातील सुमारे ३०० ते ३५० स्वामी ही दीक्षा दरवर्षी श्रद्धेने धारण करतात.

शहरातील अय्यप्पा स्वामी मंदिरासह गजानन महाराज मंदिर, साईबाबा मंदिर, ब्रह्मगुरु मंदिर (सिरमेटी रोड), गोकुंदा आदी ठिकाणी स्वामी वास्तव्यास राहून आपले व्रत पूर्ण करतात. तसेच किनवट तालुक्यातील मांडवा, बेल्लोरी, अप्पारावपेठ, बोधडी, शिवणी, मांडवी, लिंगी, घोटी आदी गावांतील भाविकही ही दीक्षा श्रद्धेने पाळतात.

ही दीक्षा कार्तिक महिन्याच्या पौर्णिमेपासून सुरू होते. मकर संक्रांतीच्या दिवशी शबरीमला येथे प्रगट होणाऱ्या मकरज्योतीच्या दर्शनाने या व्रताचा समारोप होतो. पहिल्यांदा दीक्षा धारण करणाऱ्या स्वामींना कन्या स्वामी असे संबोधले जाते. कन्या स्वामी भगवंतास विशेष प्रिय असतो, अशी श्रद्धा आहे. त्यानंतर सलग १८, २५ वर्षे अशा प्रकारे मंडल पूर्ण केली जातात. किनवट शहरात सलग ३१, २५, २१ व १८ वर्षे दीक्षा पाळणाऱ्या स्वामींची संख्या लक्षणीय आहे.

दरवर्षी ७ जानेवारी रोजी किनवट येथील अय्यप्पा स्वामी मंदिरात भव्य महाप्रसाद भंडाऱ्याचे आयोजन करून शबरीमला येथे जाणाऱ्या स्वामींना इरुमुडी प्रदान केली जाते. इरुमुडीमध्ये तूप, अन्न, वस्त्र आदी साहित्य असते. दीक्षा पूर्ण केलेल्या स्वामीने ही इरुमुडी डोक्यावर घेऊन पायी शबरीमला यात्रेला जायचे असते. दरम्यान स्वच्छतागृह वापरल्यास स्नान करूनच पुन्हा इरुमुडी डोक्यावर घ्यावी लागते. इरुमुडीतील साहित्य शबरीमला मंदिरात अर्पण केले जाते.

किनवट येथे अय्यप्पा सेवा समितीचे विलास नेम्मानिवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण दीक्षा सोहळा पार पडतो. व्यंकटराव सातुरवार गुरु स्वामी, सच्चिदानंद पवार गुरु स्वामी, सुदाम जलगमवार गुरु स्वामी व राजू कट्टावार गुरु स्वामी यांच्या सहकार्याने विधी पार पाडले जातात. मंदिरातील दीक्षेचे पौराहित्य राकेश पांडे गुरुजी यांच्या हस्ते करण्यात येते. तसेच केरळ येथील पुरोहितांकडून महापडी पूजा व अन्य धार्मिक विधी संपन्न होतात.

गेल्या सुमारे ३५ वर्षांपासून किनवट व परिसरात दरवर्षी श्रद्धा, भक्ती व शिस्तीच्या वातावरणात श्री अय्यप्पा स्वामी दीक्षा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडत असून, यावर्षीदेखील भाविकांच्या उपस्थितीने हा सोहळा भक्तिमय झाला आहे.

# आपला देश कृषी प्रधान देश आहे कृषी क्षेत्रात जास्तीत जास्त संशोधन व्हावे

**जामखेड तालुका (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर जिल्हा परिषद शिक्षण विभाग, जिल्हा विज्ञान गणित अध्यापक संघ व रयत शिक्षण संस्थेचे श्री नागेश विद्यालय व कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 53 वे जिल्हास्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनी नागेश विद्यालय व कन्या विद्यालय मध्ये उत्साहात संपन्न झाले. बाल वैज्ञानिक प्रदर्शनात जिल्ह्यातून २४२ मॉडेल सहभागी झाले. या प्रदर्शनाचे उद्घाटन ब्रह्मोस मिसाइल प्रतिकृतीने अहिल्यानगर जिल्ह्याचे अति. मुख्यकार्यकारी अधिकारी विजय मुळीक साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तर प्रमुख उपस्थिती माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड,उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर, शिक्षण उपनिरीक्षक श्रीराम थोरात, गटविकास अधिकारी शुभम जाधव शिक्षण विस्तार अधिकारी दत्तात्रय कवळे व भिवशेन पवार , पार्वती गाडेकर, गटशिक्षणाधिकारी प्रदीप चव्हाण, विस्तार अधिकारी अशोक आंधळे,केंद्र प्रमुख राम निकम , स्कूल कमिटी सदस्य हरिभाऊ बेलेकर, प्रा मधुकर आबा राळेभात ,प्रकाश सदाफुले, विनायक राऊत, बद्रीनाथ शिंदे, दशरथ कोपनर, संजयकुमार निकरट, नवनाथ घुले, धनंजय भागरे,भाऊसाहेब इतापे ,बाजीराव गर्जे,मुकुंद सातपुते, प्राचार्य मडके बी के मुख्याध्यापिका भोर आर आर, उप मुख्याध्यापक नाळे एस एन, पर्यवेक्षक जाधवर व संजय हजारे, संतोष ससाने, साळुंके बी एस. एनसीसी प्रमुख मयुर भोसले,नागेश विद्यालय कन्या विद्यालय येथील सर्व शिक्षक विद्यार्थी पालक व जिल्ह्यातील सर्व स्पर्धक उपस्थित होते.

यावेळी सर्व जिल्ह्यातून २४२ मॉडेल सहभागी झाले परीक्षक - व्ही एम वाळुंजकर, दीपक धनगर प्रफुल्लचंद्र पवार ,सोपानराव कदम ,अनिल गवळी ,बाळासाहेब सोनवणे, संदीप जगताप विक्रम कुलकर्णी ,रवींद्र हिंगे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

प्रास्ताविक प्राचार्य मडके यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. विज्ञान संघटना जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ शिंदे प्रदर्शनाचा उद्देश भारताला विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये पुढे घेऊन जाणे. पुढच्या वर्षी शेष फंडातून जास्त निधीची मदत करावी. विद्यार्थ्यांना भावी वैज्ञानिक करण्यासाठी त्यासाठी मदत होईल. विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव मिळेल. पुढील वर्षी चार दिवसाचा विज्ञान प्रदर्शन करावे असे मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.

गटविकास अधिकारी शुभम जाधव विज्ञान म्हणजे काय व त्याचा वापर कसा करावा सोप्या भाषेत समजून सांगितले विज्ञान म्हणजे कुतुहल व

प्रत्येक गोष्टीला प्रश्न विचारणे म्हणजे विज्ञान व त्या पडलेल्या प्रश्नाच्या उत्तरातून तंत्रज्ञानाची निर्मिती होते.

मुलांमधील चिकित्सिक वृत्तीतून नवनवीन प्रयोग निर्माण होतात . मुलांमध्ये कुतुहल निर्माण करण्याचे काम बाल वैज्ञानिक प्रदर्शन करत आहे. विद्यार्थ्यांनी उत्तरोत्तर प्रगती करावी असे मार्गदर्शन केले.

माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड मॅडम जिल्ह्यातील आलेले बाल वैज्ञानिकांचे अभिनंदन केले .विद्यार्थ्यांना स्वच्छते विषयीची प्रतिज्ञा दिली विद्यार्थ्यांनी पेटंट मिळवण्यासाठी प्रयत्न करावे. विद्यार्थ्यांनी नवीन वाटेवर चालण्याचा प्रयत्न करावा व नवीन शोध लागण्यासाठी नव नवीन प्रश्न निर्माण करून उत्तर शोधण्याचा प्रयत्न करावा.असे मनोगत व्यक्त केले. अहिल्यानगरचे मुख्याधिकारी विजय मुळीक अध्यक्षीय भाषणामध्ये

शिक्षक विभागाने बाल वैज्ञानिक प्रदर्शनाच्या माध्यमातून अतिशय चांगला उपक्रम राबवला आहे .विज्ञान प्रदर्शन चांगले आयोजित केल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करतो अशाच प्रकारे विविध उपक्रम राबवत रहावे.

उद्याच्या भारतामध्ये बाहेरून आलेले तंत्रज्ञान पेक्षा स्वतःचे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी लहान मुलांच्या मधून विविध शास्त्रज्ञ बनणार आहेत त्यामुळे आम्ही निधी निश्चित वाढवून देऊ .

विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक वृत्ती निर्माण होत आहे. ब्रह्मोस मिसाईलने उद्घाटन केले ही भारताची ताकद आहे केले. आपला देश कृषी प्रधान देश आहे कृषी विभागातील जास्तीत जास्त संशोधन व्हावे असे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

विद्यार्थ्यांची नाळ शेतीसाठी जुळलेली आहे अशा विद्यार्थ्यांनी शेती विषयातील तंत्रज्ञान विकसित करावे. असे मनोगत व्यक्त केले. शिस्तीचे नियोजन एनसीसी विभाग मार्फत उत्कृष्ट करण्यात आले.

विशेष आकर्षण:- ब्रह्मोस मिसाइलची हुबेहूब प्रतिकृती ने सर्व जिल्ह्यातून आलेल्या बालवैज्ञानिकांचे व मान्यवरांचे मन आकर्षित केले .

सूत्रसंचालन संभाजी इंगळे, शंभूलाल बडे तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका भोर आर आर मॅडम यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# मराठी पत्रकार संघाच्यावतीने दर्पण दिन साजरा

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**



मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांनी ०६ जानेवारी १८३२ रोजी मराठी वृत्तपत्राची सुरुवात केली. महाराष्ट्रात सर्वत्र दर्पण दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने मुदखेड शहरात मुदखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या फलकास पुष्पहार अर्पण करून बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर मुदखेड नगर परिषदेच्या वतीने नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ विश्रांती पाटील कदम यांच्या वतीने पत्रकारांना लेखणी व डायरी पुष्प देऊन स्वागत करण्यात आले पत्रकाराने शहर विकासासाठी अनेक उपयोजना सुचवून सकारात्मक बातम्या देऊन सहकार्य करण्याचे आवाहन नूतन नगराध्यक्षा सौ. विश्रांती कदम यांनी केले. यानंतर माधव पाटील कदम यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती व दर्पण दिनानिमित्त पत्रकारांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पत्रकार प्रल्हाद मस्के, नगरसेवक संजय आऊलवार,संदिप मोडवान यांनी आपले विचार मांडले. माजी नगरसेवक कैलास गोडसे, अभियंता सुमित गोडसे यांनी जनसंपर्क कार्यालयात समस्त पत्रकारांना दस्ती लेखणी पुष्प देऊन सत्कार सन्मान करण्यात आला. तसेच मुदखेड पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या वतीने डायरी लेखणी पुष्प देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला. लोकमंगल मल्टिस्टेट बँकेच्या वतीने सन्मान व सत्कार करण्यात आला. मुदखेड पोलीस ठाण्याचे पो. नि. यानी पत्रकारांच्या लेखनीतून समाजाला दिशा देण्याचे काम केले जाते शासन प्रशासन सुरळीत चालण्यासाठी लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभाचे महत्त्वपूर्ण काम असून पत्रकारांनी निर्भीडपणे कार्य करत राहावे पोलीस प्रशासन आपल्या पाठीशी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या दर्पण दिनाच्या कार्यक्रमात पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, शेख अजगर हुसेन पाशाभाई, ईश्वर पिन्नलवार जिल्हा सहसचिव, संजय कोलते, संतोष पाटील गाढे, जयराम वन्ने, उत्तम हनुमंते,रुखमाजी शिंदे साहेबराव गागलवाड, नामदेव राहेरे, अतिक अहेमद, दिनेश शर्मा, साहेबराव हौसरे, धम्मदाता कांबळे, अब्दुल रझाक, संतोष सावंत, शेख इरफान, संतोष दर्शनवाड,शेख शमशुद्दीन, मनोज कमटे, देवानंद गुंजाळ, आशिष कल्याने अमोल टेकले, हाफिज खुरेशी, म.हाकिम, पिराजी गाडेकर,अजय कांबळे, यासह आदींची उपस्थिती होती. सर्व नियोजित कार्यक्रमात सुत्रसंचालन पत्रकार संजय कोलते जिल्हा संघटक यांनी केले. दर्पण दिनानिमित्त शहरात अनेक ठिकाणी पत्रकार संघाच्या सदस्यांना पुष्प देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला.



# भाऊजाईचा खुनातील आरोपी २४ तासात अटक

**शिवनेरी: (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील आदिवासी दुर्गम भागातील निमगिरी येथे जमीन व घर या वादाच्या कारणावरून सख्ख्या भावाच्या पत्नीचा निर्घृण खून करून फरारी झालेला आरोपी तुषार निंबा साबळे याला २४ तासाच्या आत पुण्यातून अटक करण्यात जुन्नर पोलीस स्टेशन पुणे वारजे माळवाडी पोलीस ठाण्याच्या मदतीने पकडण्यात यश आले आहे . याबाबत ताबडतोब कारवाई सुरू केली आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील व पोलीस निरीक्षक किरण अवचर यांनी सीसीटीव्ही कॅमेरे तपासणी करत तात्काळ आरोपीचा शोध घेऊन अटक करण्यासंदर्भात ठिक ठिकाणी कारवाई सुरू केली. वारजे माळवाडी चे पोलीस उपनिरीक्षक सिद्धेश्वर रायगांडा यांच्या मदतीने यशोदीप चौक वारजे परिसरात रचलेल्या सापळ्यात आरोपी पकडला . याप्रसंगी आरोपीकडे चौकशी केली असता गुन्हा केल्याचे कबूल केले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल , अप्पर अधीक्षक रमेश चोपडे , उपविभागीय अधिकारी धनंजय पाटील , पोलीस निरीक्षक किरण अवचर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक रघुनाथ शिंदे , पो क. गणेश शिंदे , पो क. दादा पावडे , पो. क. कैलास केंद्रे यांच्या पथकाने मोहीम राबवली.

# केडगाव परीसरात महाविकास आघाडीच्या प्रचाराचा शुभारंभ

### खासदार निलेश लंके प्रचारात सक्रीय : धनशक्ती व दडपशाहीविरोधात जनशक्तीचा विजय निश्चित- खासदार निलेश लंके



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराचा केडगाव परिसरात ढोल-ताशांच्या गजरात शुभारंभ करण्यात आला.

केडगाव येथील रेणुका माता मंदिरात खासदार निलेश लंके यांच्या हस्ते नारळ वाढवून प्रभाग क्रमांक १७ मधील महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराची औपचारिक सुरुवात करण्यात आली.

यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार कांबळे सिद्धांत संजय (अ) व भाले अलका बालकृष्ण (ब), तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या उमेदवार जाधव आशा किशोर (क) यांच्या प्रचारार्थ खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत भव्य प्रचार रॅली काढण्यात आली.

प्रचार रॅलीदरम्यान उमेदवारांसह खासदार निलेश लंके, शिवसेनेचे शहराध्यक्ष किरण काळे, शिवसेना संपर्कप्रमुख राजेंद्र दळवी, प्रतीक भाले, राव नांगरे, संजय कांबळे आदींनी घराघरांत जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. उपनगरातील नागरिकांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रचारात कार्यकर्ते, समर्थक व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

खासदार निलेश लंके म्हणाले की, ही निवडणूक धनशक्ती व दडपशाही विरोधात जनशक्तीची आहे. सर्वसामान्य उमेदवारांवर दहशत केली जात आहे. पुन्हा एकदा भयमुक्तीसाठी नागरिकांनी निवडणुक हातात घेऊन चांगल्या उमेदवारांना निवडून देण्याची गरज आहे.

सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे, जनतेशी थेट नाते असणारे उमेदवार महाविकास आघाडीने दिले आहेत. धनदांडग्यांपेक्षा आपल्यातला, आपल्यासाठी धावून येणारा माणूस जनतेला हवा असतो आणि असेच उमेदवार महाविकास आघाडीच्या माध्यमातून जनतेसमोर उभे असून, त्यांना निवडून देण्याचे त्यांनी आवाहन केले.

# ICMAI फाउंडेशन डिसेंबर 2025 परीक्षेचा निकाल जाहीर

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

दि इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICMAI) यांच्या डिसेंबर 2025 टर्मच्या फाउंडेशन परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला असून, या परीक्षेत ICMAI नाशिक शाखेतील विद्यार्थ्यांनी नेहमीप्रमाणे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. नाशिक शाखेतून परीक्षेला बसलेल्या 124 विद्यार्थ्यांपैकी 66 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, उत्तीर्णतेचे प्रमाण लक्षणीय आहे. या परीक्षेत नाशिक शाखेतील धनंजय डुकरे यांनी प्रथम, आदित्य पिंगळे यांनी द्वितीय तर आदित्य चौधरी यांनी तृतीय क्रमांक पटकावला आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार म्हणजे प्रेरणेचा नवादीप : श्री. संजय पठाडे

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

भालगाव येथील भालेश्वर विद्यालयात बुधवार दि. ०७ जानेवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलन व गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास शिक्षण, साहित्य व अध्यात्म क्षेत्रातील मान्यवरांसह पालकवर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. श्री. लक्ष्मणराव बिटाळ (मुख्य कार्यकारी अधिकारी, कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूह, शेवगाव) हे होते. प्रमुख अतिथी म्हणून ह. भ. प. नवनाथ महाराज शास्त्री (महंत, मच्छिंद्रनाथ गड, भालगाव), सुप्रसिद्ध साहित्यिक, कवी व गझलकार श्री. संजय पठाडे तसेच प्रा. श्री. अशोक आहेर (सहप्रमुख, कर्मयोगी आबासाहेब काकडे शिक्षण विभाग) उपस्थित होते. याशिवाय विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. हनुमान गोर्डे, श्री सुदाम तात्या खेडकर, श्री बाळासाहेब खेडकर, श्री भागवत खेडकर, श्री सचिन खेडकर, श्री सर्जेराव सुपेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या स्वागतगीताने कार्यक्रमाची प्रसन्नता वाढवली.

वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक व गुणदर्शन कार्यक्रम सादर केले. यामध्ये एकल नृत्य, समूह नृत्य, नाटिका, गीतगायन व संगीत नृत्य यांचा समावेश होता. याशिवाय गणित व विज्ञान अध्यापक संघाच्या उपक्रमांतर्गत आयोजित स्पर्धा, खो-खो, कबड्डी, कुस्ती स्पर्धा, चित्रकला प्रदर्शन, रांगोळी, मेहंदी व वक्तृत्व स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांसमवेत मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व पारितोषिके प्रदान करण्यात आली.विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. हनुमान गोर्डे यांनी आपल्या प्रास्ताविकातून विद्यालयाच्या शैक्षणिक, क्रीडा व सहशालेय क्षेत्रातील यशाचा चढता आलेख मांडला तसेच शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्री. लक्ष्मणराव बिटाळ यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कष्ट, चिकाटी व जिद्द या गुणांच्या जोरावर कोणत्याही क्षेत्रात यश संपादन करता येते, असे स्पष्ट केले. सातत्यपूर्ण मेहनतीतूनच उत्तम व्यक्तिमत्त्व घडते, असे त्यांनी नमूद केले.ह. भ. प. नवनाथ महाराज शास्त्री यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना जीवनमूल्ये, शिस्त व संस्कार यांचे महत्त्व सांगितले. प्रमुख अतिथी श्री. संजय पठाडे यांनी आपल्या काव्यमय शैलीत ग्रामीण जीवनाचे वास्तव उलगडून सांगत आई-वडील व गुरु यांचा आदर्श घेऊन जीवनात प्रगती साधण्याचा संदेश दिला.

# भारतीय ज्ञान परंपरा ज्ञानाबरोबरच संस्कारही शिकविते : प्रा. सुनील कुलकर्णी

### आव्हाड महाविद्यालयात भारतीय ज्ञान परंपरा या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**



भारतीय ज्ञान परंपरेला १९६० च्या दशकापर्यंत मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न झाला परंतु कालांतराने भारतीय ज्ञान परंपरेला महत्व येऊन आज नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञान परंपरेचा समावेश करण्यात आला. भारतीय ज्ञान परंपरा ज्ञानाबरोबरच संस्कारही शिकविते, असे प्रतिपादन आग्रा येथील केंद्रीय हिंदी संस्थानचे निदेशक प्रा. सुनील कुलकर्णी यांनी केले. ते येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात केंद्रीय हिंदी संस्थान आग्रा व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भारतीय ज्ञान परंपरेच्या अनुषंगाने हिंदी व मराठी साहित्य या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड तर व्यासपीठावर जेष्ठ हिंदी साहित्यिक डॉ श्रीराम परिहार, प्रमुख अतिथी डॉ. दामोदर खडसे, प्राचार्य डॉ. बबन चौरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या हिंदी अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा डॉ. अपर्णा पाटील, डॉ. सुनील डहाळे, डॉ. फत्ताराम नायक, डॉ. संदीप, माजी प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे, डॉ. अशोक डोळस आदी उपस्थित होते.

प्रा. कुलकर्णी पुढे म्हणाले, पूर्वी अभ्यासक्रमात पाश्चात्य विचारसरणीचा प्रभाव असल्याने भारतीय ज्ञानपरंपरा दुर्लक्षित राहिली. पाश्चात्य विचारधारेचा प्रभाव आपल्या खानपान, वेशभूषा, विचारसरणी यावर पडला. गुरुकुल शिक्षणपरंपरेत ज्ञानाबरोबरच संस्कार शिकविले जायचे. आज एआय च्या युगात ज्ञान मिळेल पण संस्कार मिळणार नाही. आज ज्ञानापेक्षाही संस्काराची सर्वात जास्त आवश्यकता आहे. आज

बीजभाषक डॉ. श्रीराम परिहार यांनी भारतीय ज्ञान परंपरेचा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये समावेश करण्याबद्दलचे महत्व विषद केले. भारतीय ज्ञान परंपरेची मुळे भारतीय संस्कृतीत खोलवर रुजलेली असून हीच ज्ञानपरंपरा आपल्याला प्रकाशाकडे नेते. गुरूंच्या माध्यमातून ज्ञान परंपरा अविरत झिरपत असून आज आयुर्वेदाचा होत असलेला प्रसार भारतीय ज्ञानपरंपरेचा परिपाक

प्रत्येक आजाराचे मुळ ताणतणाव असून साधना व मनधरणा तणावमुक्तीसाठी आवश्यक आहे. लिव्ह इन रिलेशनशिप सारख्या संकल्पनांना भारतीय ज्ञान परंपरा योग्य मानत नाही.

प्रमुख अतिथी दामोदर खडसे यांनी चर्चासत्रात मार्गदर्शन करतांना हिंदी भाषा घेऊन पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना असणाऱ्या करिअरच्या संधी यावर सखोल मार्गदर्शन केले.

# समूहगीत गायन स्पर्धेत लहान गटात शिक्षक कॉलनी तालुक्यात प्रथम

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

सप्टेंबरमध्ये नव्याने हजर झालेले मुख्याध्यापक श्री. बाबासाहेब जायभाये, श्रीम. संगीता बुधवंत यांनी विविध उपक्रम राबवून पालकांचे लक्ष वेधून घेतले.ग्रामस्थांनी एक लाखापेक्षा जास्त रुपयाच्या वस्तू रूपाने मदत केली. केंद्र पातळीवर गायनातील दोन क्रमांक आले होते. त्यापैकी वैयक्तिक व समूहगीत गायन या दोन प्रकारात तालुका स्पर्धेत सहभाग घेतला होता.




वैयक्तिक मध्ये प्रिन्सी अजय गुप्ता हिने 'राधे तुला पुसतो घोंगडीवाला' हीं गौळण सादर केली. तिच्या गायनाचं उपस्थितानी तोंडभरून कौतुक केले. समूहगीत गायनात तालुक्यात प्रथम क्रमांक आला त्याबद्दल गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड, विस्ताराधिकारी रामनाथ कराड, अनिल भवार, केंद्रप्रमुख दगडू महांडुळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंबादास चव्हाण,आकाश वारे ग्रामपंचायत सदस्य, किशोर चव्हाण उपसरपंच, सुनिता जाधव ग्रामपंचायत सदस्य, प्रमोद भावसार, भारत नन्नवरे, अशोक तुपे, पांडुरंग वारे, सनी गायकवाड, विकास बावणे, संदीप खोटे, अजय गुप्ता, अरविंद शिरसाट, सोनाली उपाध्ये, सोनाली बावणे, कोमल राठोड, सुरेखा पवार, माधुरी टिपरे, मनिषा चव्हाण,गंगू चव्हाण,अश्विनी काळोखे, मीराताई मोहिते आदींनी मुलांचे कौतुक करून पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.

# ओबेन इलेक्ट्रिक ठरली पहिली यशोगाथा




**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील सर्वात वेगाने वाढणारी इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक कंपनी ओबेन इलेक्ट्रिकला, झी टीव्हीच्या आयडियाबाज या स्टार्टअप रिॲलिटी शोमध्ये पहिली यशोगाथा म्हणून सादर करण्यात आले आहे. जगातील सर्वात गुंतागुंतीच्या आणि भांडवल-केंद्रित क्षेत्रांपैकी एक असलेल्या ऑटोमोटिव्ह उद्योगात, एका धाडसी दृष्टिकोनाचे संपूर्ण भारतातील व्यवसायात रूपांतर करणाऱ्या एका स्थानिक, संशोधन आणि विकास-चालित कंपनीचे कौतुक करण्यासाठी ही मान्यता देण्यात आली आहे.

या यशामागे चिकाटी आणि धैर्याची मानवी कहाणी आहे. एका छोट्या गॅरेजमध्ये मोठ्या कल्पना आणि सामायिक स्वप्नांसह सुरू झालेला हा प्रवास आज भारतातील सर्वात वेगाने वाढणारी इलेक्ट्रिक मोटरसायकल कंपनी बनला आहे.

# छत्रपती शिवाजी महाविद्यालयात व्याख्यानमालेचे यशस्वी आयोजन

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, बहिशाल शिक्षण मंडळ आणि श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब जयकर तीन दिवसीय व्याख्यानमालेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या व्याख्यानमालेचे आयोजन संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष श्री. राजेंद्रदादा नागवडे, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका मा. सौ. अनुराधाताई नागवडे तसेच संस्था निरीक्षक मा. सचिन लगड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.



व्याख्यानमालेतील पहिले व्याख्यान सीमा जोशी (अत्रे) यांनी "आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI)" या विषयावर दिले. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचे आधुनिक जगातील महत्त्व, त्याचे विविध उपयोग व भविष्यातील संधी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दुसरे व्याख्यान डॉ. विजयकुमार जोशी यांनी "हसण्यास टॅक्स लागत नाही" या विषयावर सादर केले. आपल्या विनोदी शैलीतून त्यांनी सकारात्मक दृष्टिकोन, हास्याचे आरोग्यदायी फायदे आणि तणावमुक्त जीवनाचे महत्त्व अधोरेखित केले.

व्याख्यानमालेतील तिसरे व्याख्यान मा. प्राचार्य गोरक्ष भापकर यांनी "तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार" या विषयावर दिले. वास्तव जीवनातील अनुभव मांडत त्यांनी परिश्रमातून आत्मविश्वास निर्माण होतो आणि हाच आत्मविश्वास जिद्द, त्याग, चिकाटी व सातत्याच्या जोरावर यशात परिवर्तित होतो, असा मोलाचा संदेश विद्यार्थ्यांना दिला.

या व्याख्यानमालेचे प्रास्ताविक बहिशाल केंद्र कार्यवाह प्रा. डॉ. सचिन धेंडे यांनी केले. त्यांनी डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे प्रयोजन स्पष्ट करत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच डॉ. बाबासाहेब जयकर यांच्या कार्याचा ऐतिहासिक आढावा घेतला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. सतिषचंद्र सूर्यवंशी होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले की, व्याख्यानमाला विद्यार्थ्यांमध्ये मानसिक समृद्धता निर्माण करते. हसतमुख राहणे आरोग्यासाठी महत्त्वाचे असले तरी विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून सातत्याने प्रयत्न करावेत. संघर्ष जितका मोठा, तितके यशही मोठे असते. काळानुसार बदल स्वीकारून नवी कौशल्ये आत्मसात करण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किरण नागवडे यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ. राजेश बाराते यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. धर्मनाथ काकडे, प्रा. अमोल बोराडे, प्रा. मनोहर उंडे, डॉ. प्रविण पिसे, प्रा. विवेक शेलार, प्रा. डॉ. ज्ञानेश्वर कर्पे, प्रा. डॉ. प्रमोद परदेशी, प्रा. डॉ. संदीप अभंग यांनी विशेष सहकार्य केले.

या व्याख्यानमालेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# तुम्ही मुलांचे 'हेलिकॉप्टर पेरेंट' आहात का?




## संपादकीय

तुमची मुलं करत असलेल्या प्रत्येक गोष्टीत तुम्ही अती लक्ष घालता का? त्यांच्या प्रत्येक गोष्टीत तुमच्या नकळत ढवळाढवळ करता का? त्यांच्याकडून कुठलीही चूक होऊ नये यासाठी सतत धडपडता का? त्यांचा अभ्यास, त्यांच्या दैनंदिन जगण्यातली प्रत्येक बारीकसारीक गोष्ट ही तुम्हाला तुमची जबाबदारी वाटते का? त्यांच्याबद्दलचा प्रत्येक निर्णय तुम्ही स्वत: घेता का? आपली मुलं कुठे आहेत? काय करत आहेत? कुणाशी बोलत आहेत हे सतत 'ट्रॅक' करता का? तसं असेल तर तुम्ही 'हेलिकॉप्टर पेरेंटिंग' करता आहात आणि त्याचा नकारात्मक परिणाम तुमच्या मुलांच्या सर्वंकष वाढीवर होणं शक्य आहे.

अशा पालकत्वामध्ये मुलांकडून कुठलीही चूक होऊ नये असा प्रयत्न पालक करत असतात. मुलांच्या गृहपाठापासून ते प्रत्येक दैनंदिन गोष्टीत पालकांचा अतिरिक्त हस्तक्षेप असतो. मुलांकडून कुठलीही चूक होऊ नये, त्यांना अपयशाचा सामनाच करायला लागू नये, अशी त्यांची अपेक्षा आणि तसाच प्रयत्नही असतो. मुलांच्या दिनक्रमातल्या प्रत्येक मिनिटाचं 'टाइम टेबल' हे पालक करतात. त्यामुळे मुलांना मोकळा वेळ म्हणजे काय आणि त्याचं काय करायचं हेही माहिती नसतं. त्याचा परिणाम मुलांच्या मानसिकतेवर होतो. त्यांचा आत्मविश्वास कमी होतो. प्रत्येक बाबतीत ती परावलंबी होण्याचा धोका असतो. मुलांनी काय शिकायचं, कसं शिकायचं हे शोधून पहाण्याची संधीच हे पालक आपल्या मुलांना देत नाहीत, त्यामुळे स्वतःला काय आवडतं याचा शोध घेण्याची सवय मुलांना लागत नाही.

मुलांना काय वाटतं याचा विचार न करता बहुतेकवेळा मुलांसाठी पालकांनी निर्णय घेतल्यामुळे मुलांमध्ये निर्णय क्षमताच विकसित होत नाही. निर्णयच न घेतल्यामुळे त्या निर्णयांचे परिणाम काय असतील, ते कसे हाताळायचे याची सवयही मुलांना लागत नाही. त्याचा मुलांच्या जडणघडणीवर नकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे 'हेलिकॉप्टर पेरेंटिंग' हा मुलांच्या निकोप वाढीतला अतिशय मोठा अडथळा आहे. 'डिफॉल्ट पेरेंट सिंड्रोम' या संकल्पनेत 'सिंड्रोम' असा शब्द असला तरी तो वैद्यकीय निदानातून सिद्ध होणारा आजार नाही. मात्र



पालकत्वाची सर्वाधिक शारीरिक आणि मानसिक जबाबदारी एकट्याने उचलत असलेल्या व्यक्तींसाठी या संकल्पनेचा वापर केला जातो. बहुतेकवेळा ही व्यक्ती आई असते. मूल, नोकरी किंवा व्यवसाय, घरातील जबाबदारी या सगळ्या आघाड्यांवर एकटीने लढत असल्यामुळे तिला डिफॉल्ट पेरेंट म्हटलं जातं. याउलट कधीतरीच किंवा नाइलाजाने या जबाबदारीत मदतीचा हात पुढे करणारी व्यक्ती ही 'बॅकअप पेरेंट' म्हणून ओळखली जाते. मुलांच्या दैनंदिन गरजा, भावनिक आधार, डॉक्टर आणि लसीकरणाचं वेळापत्रक ते शाळा, शिक्षण अशा सगळ्याच गोष्टी ही आपली जबाबदारी आहे, असं मानणारी पालकांमधील पहिली व्यक्ती म्हणून आईकडे पाहिलं जातं. अलीकडे बहुतेक महिलाही नोकरी-व्यवसाय करत असल्यामुळे बाहेरील जबाबदारी सांभाळून त्यांना मुलांकडे पाहावं लागतं. त्यात त्यांची ओढाताणही होते.

जगातील बहुसंख्य भागांमध्ये बहुदा नेहमीच आई ही मुलांची डिफॉल्ट पेरेंट असते, मात्र २०२० नंतर सोशल मीडियाने त्या आईला 'डिफॉल्ट पेरेंट' हा शब्द दिला.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ६९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | 2 | 5 | | | 6 | |
| | 7 | 9 | 8 | | 4 | | | |
| | 1 | | | 3 | | | | 4 |
| | 2 | | | 9 | | 7 | 3 | |
| 8 | 5 | | 1 | | 3 | | 9 | 2 |
| | 6 | 3 | | 8 | | | 4 | |
| 3 | | | | 6 | | | 2 | |
| | | | 9 | | 8 | 3 | 1 | |
| | 9 | | | 2 | 1 | | | 6 |

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ६८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 2 | 1 | 3 | 5 | 9 | 8 | 4 | 6 |
| 9 | 3 | 4 | 7 | 6 | 8 | 5 | 1 | 2 |
| 8 | 5 | 6 | 1 | 4 | 2 | 9 | 3 | 7 |
| 1 | 4 | 2 | 5 | 8 | 6 | 7 | 9 | 3 |
| 5 | 6 | 8 | 9 | 7 | 3 | 4 | 2 | 1 |
| 3 | 9 | 7 | 2 | 1 | 4 | 6 | 8 | 5 |
| 6 | 1 | 9 | 4 | 2 | 7 | 3 | 5 | 8 |
| 2 | 8 | 3 | 6 | 9 | 5 | 1 | 7 | 4 |
| 4 | 7 | 5 | 8 | 3 | 1 | 2 | 6 | 9 |

उत्तर उद्याच्या अंकात

| | | |
|---|---|---|
| पंचांग | अयन- उत्तरायणारंभ | १३:४०:२९ |
| ९ जानेवारी २०२५ | मास- पौष | योग:शोभन १६:५५:०४ |
| शुक्रवार | ऋतु- सौर शिशिर | करण:विष्टि १९:३९:२७ |
| विक्रम संवत्- २०८२ | कृष्ण पक्ष | करण:बव (अहोरात्र) |
| पौष शके संवत्- १९४७ | तिथि:सप्तमी (अहोरात्र) | सूर्य:धनु |
| संवत्सर - विश्वावसूनाम | नक्षत्र:उत्तराफाल्गुनी | चन्द्र:कन्या |

## उपदेशाचे डोस

### स्वीकार

एका गावात बुद्धदेवांचा मुक्काम होता. ते भिक्षा मागण्यासाठी म्हणून बाहेर पडले. भिक्षेसाठी घरा-घरातून फिरताना बुद्धदेव एका पंडिताच्या घरासमोर भिक्षा मागण्यासाठी गेले. 'भिक्षा वाढा माई' असे म्हणताच त्या घरातून एक पंडित बाहेर आला. तो बुद्धदेवांना अचकट-विचकट शिव्या देऊ लागला. बुद्धांनी त्या शिव्या ऐकल्या मात्र, त्यावर कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त न करता ते तसेच पुढच्या घरात जाऊ लागले. आपण एवढ्या शिव्या देत असताना या संन्याशाने मात्र गप्पच राहावे त्याचे पंडिताला आश्चर्य वाटले. त्याने बुद्धांना विचारले, 'काय रे संन्याशा, मी तुला एवढ्या शिव्या देतो आहे तरी तू शांतच. काहीच कसं प्रत्युत्तर दिले नाहीस?' बुद्धदेव म्हणाले, 'पंडितजी, तुमच्या घरात कोणी पाहुणा आला, त्याला तुम्ही काही खायला दिले व त्याला ते खाणे नको असेल तर पाहुणा काय करील?' 'त्यात काय, तो ते खाणार नाही. आम्हाला परत करील' पंडितजी म्हणाले. यावर बुद्धदेव म्हणाले, 'बरोबर आहे तुमचं म्हणणं. त्या पाहुण्याला नको असलेला खाऊ त्याने तुम्हाला परत केल्याने तो तुमच्याकडे राहिला तसेच तुमच्या मला नको असलेल्या शिव्या मी स्वीकारल्या नाहीत. त्या तुमच्याकडेच राहिल्या. मग मी अधिक शिव्या आपल्याला का देऊ?' बुद्धांच्या या मार्मिक उत्तराने त्या पंडिताला पश्चाताप झाला. त्याने बुद्धदेवांची क्षमा मागितली.

कथा उपदेश : दुसऱ्याने आपल्याशी वाईट वर्तणूक केली म्हणून आपण त्याच्याशी वाईट वागू नये.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९६९- काँ कॉर्ड य परवासी स्वनातील वेगाने उडणाऱ्या विमानाची चाचणी यशस्वी.
- २००८ - मेक्सिकोत स्वेच्छामरण कायदा लागू करण्यात आला.

### राष्ट्रीय

- १२८८- संत ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या तोंडून पैठण येथे सर्वभूती आत्मा एकच आहे. हे सिद्ध करण्यासाठी वेद वदवले.
- १६३३- संत तुकाराममहाराजांना भडाऱ्याच्या डोंगरावर स्वप्नात गरुड उपदेश झाला.
- १८८०- आद्य क्रांतिकारक वासूदेव बळवंत फडके यांना राजद्रोहाच्या आरोपावरून जन्मठेपेची शिक्षा. त्यांना 'तेहेरा' या जहाजावरून एडनला पाठविण्यात आले.
- १९१५- महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतले.


### जन्म

- १९२२- अनुवंशशास्त्रातील नोबेल परितोषिकविजेते संशोधक हरोगविद खुराणा यांचा जन्म.
- १९२५- सौंदर्य शास्त्रो अभ्यासक, समीक्षक रा. भा. पाटणकर यांचा जन्म.

### निधन

- १८४८- कॅरॉलीन हर्शेलचे निधन. या खगोलशास्त्रज्ञ महिलेने भाऊ विल्यम हर्शेलच्या निरीक्षणांना आणि त्यांच्या गणिती आकडेमोडीस मदत केलीच; पण स्वत- आठ नवे धुकेतू बघितले.
- २००४- राष्ट्रीय ख्यातीचे पखवाजवादक शंकरबापू आपेगावकर अणि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय इंग्रजी कवी व नाटककार निस्सीम इझिक्किएक यांचे निधन.
- २००५- इंग्लंडचा राजपुत्र

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ६९



**आडवे शब्द**

१.जसा राजा तशीच त्याची प्रजा असते या अर्थी एक म्हण
६.संगर,काला
१०.नवरा मुलगा
११.शहर
१२.पोळया भाजण्याचे साधन
१३.शिजवलेली दाळ
१५.साम्यता,असमानताच्या विरूध्द
१७.कपाळ,ललाट
१८.फळातील द्रव
१९.'-- पुरता मामा' एक म्हण
२०.कागद फाटण्याचा आवाज
२१.सावध,दक्ष
२२.आण,कसम मराठीत
२४.खराब उलटा करा
२७.सरळ,तडक
२८.बाण,शर
२९.हृदय
३०.उपयोग
३२.हिरकणीचा उपयोग ही कापण्यासाठी होतो
३४.कावळयाचा रंग
३५.भार,ओझे
३६.अटीतटीची भाशा
३७.केस काळे करण्याचे साधन
३८.नकली,बनवलेला
३९अ.इंग्रजीत चावी
४०.वडीलांचा भाऊ
४१.दुसऱ्याच्या शरीरात प्रवेश करणे
४४.पहाटे आरवणारा प्राणी,कॉक मराठीत
४६.सुगंध,दरवळ
४८.एक लिपी
४९.मासा पकडण्याचा आकडा
५१.शिवाय,म्हैस
५२.भेट,संगम
५३.सापाने टाकलेली त्वचा
५४.हार,सर
५५.भिंतीवर सरपटणारा सरडयाच्या जातीचा एक प्राणी
५६.प्रजा,जन
५७.वासना,इच्छा
६०.घुसणे,प्रवेश करणे
६२.एक फुल झाड
६३.खाली,रिक्त
६४.फटाक्यांची माळ
६५.योग्य,सुरळीत
६६.एक काटेरी फळ
६९.उणीव,ददात
७२.लकाकी,चमक
७३.पवन,वात
७५.मादीचा जोडीदार
७६.थापा मारणारा
७७.चोप,ताडण
७८.सडेतोड,सणसणीत

**उभे शब्द**

१.वेळ मिळेल तसा,सवडीप्रमाणे
२.सिता हरण करणारा राक्षस
३.परस्त्रिशी संग ठेवणारा
४.डामडौल,ऐट
५.माहीतगार,ज्ञात असलेला
६.उन्हाळयातील लिंबु पाणी पेय
७.गोड बोलणारा,भाशण करणारा
८.प्रश्न हिंदीत
९.खरडुन पूसून,भेदभाव न करता
१४.लक्ष्मीपती,विस्णु
१५.वरचढ,डोईजड
१६.नराचा बळी
१८.रात्री बाहेर फिरायला निघणारा
२३.भितीने होणारा शरीराचा कंप
२५.राजकिर्द,सत्तेचा कालावधी
२६.एक सरपटणारा प्राणी
२९.इच्छा,वासना
३०.स्त्रीया संक्रांतीला हे देतात
३१.धुळकण
३२.ऐन तिन्ही सांजेची वेळ
३३.घराबाहेर न निघुन कुणासोबत ही न मिसळणारा
३८.भिमाने वध केलेला एक खादाड राक्षस
३९.घर,भवन हिंदीत
४१.दुसऱ्यांवर उपकार करणारा
४२.एक विदेशी मदय प्रकार
४३.विकास झालेला,विकसनशील
४५.उपेक्षा करणे,अनादर करणे
४७.हे म्हणजे ते व ते म्हणजे हे
५०.तळे,सरोवर
५४.मालवणी भोशत मला
५५.स्वयंपाक शास्त्र
५८.एकोणचाळीस उभेचे उत्तर पहा
५९.अभंगातील नामदेव महाराज
६१.रडुन सांगीतलेली कथा
६६.मुसलमानी भिक्षुक
६७.एक अधिक पाव
६८.'देवाची --- अन नारळात पाणी'
७०.ग्रामिण स्वप्न
७१.नेहमी रडणारा
७२.खंदक,खाण
७४.रक्षा,राखुंड
७५.बोटाच्या अग्रभागावरील कठीण आवरण

उत्तर उद्याच्या अंकात

**शब्दकोडे क्र. ६८ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.अमर जवान ६.निकाल ९.सागरतट १२.जानवर १४.वराह १५.वासरू १६.मुरमाड १८.रमावर २०.नासका २१.माणूस २३.पाईक २५.नाथ २६.दर्या २७.कमाल किमान २९.पाय ३०.रम ३२.साय ३३.वासर ३४.मकरंद ३६.तनमनधन ३७.गो ३८.अधोवदन ४०.रतन ४२.वामनावतार ४६.तर ४७.माय ४८.वरवर ४९.खारट ५०.रणरण ५२.गतकाल ५४.रण ५५.रमा ५७.नविन ६०.सटवाई ६२.तरू ६३.सन ६५.शेवट ६७.परवा ६९.दरारा ७०.षटकार ७२.खलबत्ता ७४.खराब ७६.मगर ७७.तरतरी ८०.कर ८१.मणी ८२.खडकाळ

उभे उत्तर : १.अजागळ २.मन ३.रवळनाथ ४.जर ५.नगर ६.निवडणूक ७.कारा ८.लहर १०.गवार ११.रस १२.तरूणाई १६.मुकादम १७.मामा १९.वरमाय २२.समाधान २४.कदरदान २५.नायक २८.किसान २९.पामर ३०.रद ३१.जनन मरण ३३.वातावरण ३५.रंगीत ३९.धोंतर ४०.रयत ४१.नवलविशेष ४२.वावर ४३.वखार ४४.तार ४५.रटरट ४७.मागमूस ५१.रडतराऊत ५३.कान ५६.मावा ५८.नवटाक ५९.टप ६०.सवाल ६१.ईद ६४.नखरा ६६.टका ६८.रखरख ७१.रमणी ७३.बरका ७४.खर ७५.बक ७८.रम्य ७९.रीत

# सिस्पे घोटाळ्याची सीबीआय चौकशी होणार !

## गरीबांचा पैसा गिळणाऱ्यांना थेट जेलचा रस्ता मुख्यमंत्र्यांचा अहिल्यानगरमध्ये इशारा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

गरिबांच्या कष्टाच्या पैशावर डल्ला मारणाऱ्यांविरोधात राज्य सरकार निर्णायक लढा उभारणार असल्याचे स्पष्ट संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सिस्पे प्रकरणाच्या माध्यमातून ज्यांनी सामान्य नागरिकांची फसवणूक केली, त्यांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही, असा कडक संदेश त्यांनी दिला. हा घोटाळा उघडकीस आणण्यासाठी केंद्रातील गृहमंत्र्यांशी चर्चा करून तपास केंद्रीय अन्वेषण ब्युरोकडे सोपवण्याची मागणी केली जाणार असून दोषी आढळणाऱ्यांना तुरुंगवास झाल्याशिवाय सरकार स्वस्थ बसणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित जाहीर सभेत मुख्यमंत्री बोलत होते. भाजपा–राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारासाठी झालेल्या या सभेत राज्यातील व जिल्ह्यातील अनेक वरिष्ठ नेते, लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या व्यासपीठावरून बोलताना मुख्यमंत्र्यांनी गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराविरोधातील सरकारची भूमिका स्पष्ट शब्दांत मांडली.

सभेत उपस्थितांना संबोधित करताना मुख्यमंत्री म्हणाले की, निवडणूक प्रक्रियेच्या सुरुवातीलाच महायुतीचे पाच नगरसेवक बिनविरोध निवडून आले, ही बाब जनतेचा विश्वास दर्शवते. निवडणुकीची सुरुवातच आशादायक झाली असून अशा सकारात्मक प्रारंभातूनच विजयाचा मार्ग सुकर होतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महानगरपालिकेत महायुतीचाच महापौर विराजमान होईल आणि स्पष्ट बहुमत मिळेल, असा ठाम दावा त्यांनी केला.

जनतेला थेट आवाहन करताना मुख्यमंत्री म्हणाले की, मतदानाच्या दिवशी मतदारांनी फक्त दोनच चिन्हे लक्षात ठेवावीत. जिथे कमळ दिसेल तिथे कमळ दाबावे आणि जिथे घड्याळ दिसेल तिथे घड्याळ दाबावे. मतदानानंतर पुढील पाच वर्षे जनतेच्या विकासाची जबाबदारी सरकार पूर्ण ताकदीने उचलणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

इतिहासाचा संदर्भ देत मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या विस्तारात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांनी राज्य कसे चालवावे, सामान्य माणसाचे रक्षण कसे करावे, समृद्धी आणि उद्योगधंदे कसे वाढवावेत याचा आदर्श घालून दिला. त्यांच्या जन्मस्थानी चोंडी येथे मंत्रिमंडळाची बैठक घेऊन त्या परिसराचा सर्वांगीण विकास आराखडा तसेच महाराष्ट्रातील सर्व ज्योतिर्लिंगांच्या विकासाचा व्यापक आराखडा तयार केल्याची माहितीही त्यांनी दिली.



विरोधकांकडून लाडकी बहीण योजना बंद होणार असल्याचा अपप्रचार केला जात असल्याचा उल्लेख करत मुख्यमंत्री म्हणाले की, योजना सुरू होऊन एक वर्षाहून अधिक काळ झाला असून ती अखंडपणे सुरू आहे. जोपर्यंत ते मुख्यमंत्री आहेत, तोपर्यंत ही योजना कुणीही बंद करू शकणार नाही, अशी ठोस ग्वाही त्यांनी दिली. राज्यात पन्नास लाख 'लखपती दीदी'चा टप्पा पार झाला असून लवकरच एक कोटी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे लक्ष्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भविष्यात अहिल्यानगरला आल्यावर स्थानिक लोकप्रतिनिधींना त्यांनी किती लाडक्या बहिणींना लखपती बनवले, हा प्रश्न विचारणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## प्रा. रामदास तांबे यांना पुरस्कार प्रदान



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ओतूर. ता:-जुन्नर येथील रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूलचे विश्वस्त, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक तसेच अनेकांचे प्रेरणास्थान असलेले रामदासजी तांबे.यांना काव्यमित्र प्रकाशन संस्था,डेक्कन,पुणे यांच्या वतीने" राष्ट्रीय जीवन गौरव "पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. शिक्षण व साहित्य क्षेत्रात केलेल्या दीर्घकालीन, निष्ठावंत व मोलाच्या कार्याची दखल घेत हा मानाचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. प्रा. तांबे सरांचे लेखन म्हणजे शब्दांची कलात्मक गुंफण असून, प्रत्येक प्रसंगाला साजेसे असे त्यांचे लेखन वाचकांच्या मनाला स्पर्श करून जाते.त्यांच्या लेखनात जीवनमूल्ये, सामाजिक भान व सकारात्मकतेचा सुगंध अनुभवास येतो. शिक्षक, परीक्षक, मार्गदर्शक व साहित्यिक अशा विविध भूमिकांतून त्यांनी समाजाला दिलेले योगदान उल्लेखनीय आहे.अशी ज्ञानसमृद्ध 'ज्ञानगंगा' प्रत्यक्ष रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूलमध्ये अखंडपणे प्रवाहित होत असल्याचा सार्थ अभिमान शाळा परिवारास आहे.कोणतेही मोठे यश हे अथक परिश्रम, सातत्य आणि समर्पणातूनच मिळते, याची प्रचिती या सन्मानामुळे येते. या राष्ट्रीय पातळीवरील गौरवामुळे ओतूर परिसरासह शिक्षण व साहित्य क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रा. रामदासजी तांबे सर यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे. सरांच्या पुढील वाटचालीस रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूल ओतूरच्या वतीने मानाचा मुजरा.



## 'चेन अँड बँगल्स महोत्सव'ने स्वागत

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह वारसाहक्क लाभलेला दागिन्यांचा ब्रँड पीएनजी ज्वेलर्स पुन्हा एकदा आपल्या बहुप्रतिक्षित चेन अँड बँगल्स महोत्सवासह सज्ज झाला आहे. ५ जानेवारी २०२६ पासून देशभरातील सर्व पीएनजी ज्वेलर्स शोरूम्समध्ये सुरू होणारा हा महिनाभराचा महोत्सव, दैनंदिन वापरासाठी तसेच सण-समारंभांसाठी उपयुक्त अशा दोन प्रकारचे दागिने ग्राहकांना उपलब्ध करून देतो.

## कॅटवे चषकाचा मानकरी ठरला, शिवनेर स्पोर्ट्स क्लब बोडकेनगर जुन्नर

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

कॅट वे स्पोर्ट्स क्लबचा दिवंगत खेळाडूंचा स्मरणार्थ कॅट वे चषकाचे आयोजन करण्यात आले होते, अत्यंत उत्साहात आणि खेळीमेळीचा वातावरणात ही स्पर्धा संपन्न झाली पुणे,अहिल्यानगर जिल्ह्यातील एकूण सोळा संघानी यात सहभाग घेतला होता,लीग पद्धतीने ही स्पर्धा पाच दिवस खेळविण्यात आली.या स्पर्धेला तालुक्यातील क्रीडाप्रेमिनी व शालेय विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला,या स्पर्धेत अनेक नावीन्यपूर्ण संकल्पना प्रथमताच राबविण्यात आल्या. स्पर्धेचा शेवटचा दिवशी कॅट वे स्पोर्ट्स क्लब यांनी शिवजन्म भूमीतील विवीध खेळातील राष्ट्रीय खेळाडूंची सजवले ल्या गाडीतून संपूर्ण मैदानात मिरवणूक काढून त्यांना मानवंदना देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला,





यात अंडर १९ संघात निवड झालेला रविराज गायकवाड,आयर्नमॅन डॉ अमोल डुंबरे,राहुल तांबे, राष्ट्रीय पदक विजेता सायकलपटू अमित बोऱ्हाडे, अनुज वाघमारे,अवनी तांबे,काव्या नायकोडी,शरद माळवे,सुधीर साबळे,यांचा समावेश होता स्पर्धेदरम्यान उपस्थित प्रेक्षकांसाठी लकी ड्रॉ ठेवण्यात आला होता, त्याला देखील भरपूर प्रतिसाद मिळाला,महाअंतिम सामना शिवनेर बोडकेनगर व शिव छत्रपती वॉरियर्स जुन्नर यांच्यात झाला अत्यंत अटीतटीच्या लढतीत शिवनेर बोडकेनगर या संघाने प्रथम क्रमांकाचे पासष्ट हजाराचे बक्षीस व मानाची ट्रॉफी जिंकली,द्वितीय क्रमांक शिव छत्रपती वॉरियर्स जुन्नर,तृतीय क्रमांक विकी स्पोर्ट्स क्लब आळे व चतुर्थ क्रमांक युवा ११ ओतूर यांनी पटकावला,मालिकावीर किताबाचा मानकरी प्रमोद बोडके हा ठरला त्यांना स्पोर्ट्स सायकल बक्षीस देण्यात आली,बेस्ट बॉलर शिवा पाडेकर,बेस्ट फिल्डर जमीर इनामदार, उत्कृष्ट फलंदाज सिद्धू भोर,तर मैदानाचा राजा पुरस्काराचा मानकरी अभि खंडागळे ठरला, विजेत्यांना स्पोर्ट्स सायकल बक्षीस देण्यात आले.

पारितोषिक वितरण समारभावेळी सरपंच छाया तांबे, उपसरपंच प्रशांत तांबे,मोहित ढमाले, छबूराव तांबे,गणेश डुंबरे,संतोष टिकेकर,बाळकृष्ण कवडे,विशाल तांबे, माधवराव डुंबरे,शोभा टिकेकर यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## पत्रकारांची सामाजिक भूमिका व पुढील वाटचालीवर मार्गदर्शन

### घोटी येथे पत्रकार दिनानिमित्त मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणाऱ्या पत्रकार दिनाचे औचित्य साधून नाशिक जिल्हा मराठी पत्रकार संघ (रजि.) संलग्नित इगतपुरी तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने घोटी येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. घोटी ग्रामपालिकेच्या साधना सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी सरपंच राजेंद्र जाधव, मदन रूपवते, ग्रंथमित्र बाळासाहेब पलटणे, ग्रामविकास अधिकारी बाजीराव डांगे, शाम जाधव, भोलेनाथ काळे, रमजान



खलिफा,ग्रामपंचायत कर्मचारी तसेच पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ग्रंथमित्र बाळासाहेब पलटणे यांनी आचार्य जांभेकर यांच्या पत्रकारितेतील योगदानाचा आढावा घेतला. समाजप्रबोधन, सत्यनिष्ठा आणि निर्भीड लेखन हीच पत्रकारितेची खरी ओळख असून आजच्या काळात पत्रकाराने अधिक जबाबदारीने काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. पत्रकार हा केवळ बातमीदार नसून तो समाजाचा आरसा असल्याचे परखड मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचा समारोप करताना इगतपुरी तालुका मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष गोपाल शिंदे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "आजचा पत्रकार कोणत्याही सोयीसुविधा नसताना समाजातील विविध प्रश्न, अन्याय व प्रशासनातील त्रुटी मांडत असतो. हे करताना गावात किंवा समाजात तेढ निर्माण होणार नाही, याचे भान राखून पत्रकाराला आपली भूमिका पार पाडावी लागते. हीच खरी पत्रकारितेची कसोटी आहे." असे सांगितले.

यावेळी इगतपुरी तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष पुरुषोत्तम राठोड, विजय बारगजे, जाकीर शेख, राहुल सुराणा यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते. उपस्थित सहकाऱ्यांनी पत्रकारितेच्या पुढील दिशेबाबत सकारात्मक चर्चा करत नव्या पिढीला प्रेरणा देणारा आदर्श निर्माण करण्याचा संकल्प व्यक्त केला.



## ५० हून अधिक शेत / पानंद रस्त्यांना मंजुरी आ. काशिनाथ दाते सर

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाच्या ग्रामीण विकासासाठी सातत्याने कार्यरत असलेले आमदार काशिनाथ दाते सर यांच्या प्रभावी पाठपुराव्याला मोठे यश मिळाले असुन मनरेगा अंतर्गत मातोश्री ग्राम समृद्धी शेत / पानंद रस्ते योजना २०२५–२६ अंतर्गत पारनेर व नगर तालुक्यातील ५० हून अधिक शेत व पानंद रस्त्यांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली असून, यामुळे हजारो शेतकरी व ग्रामस्थांना थेट लाभ होणार आहे.

या मंजुरीमध्ये पिंपळगाव रोठा, देवीभोयरे, निघोज, पिंपळनेर, पाडळी तर्फे कान्हूर, म्हस्केवाडी, पाबळ, पोखरी, लोणी हवेली, भांडगाव, सारोळा अडवाई, चिंचोली, जामगाव, माळकुप, निमगाव घाणा, कर्जुले हर्या, भोंद्रे, सावरगाव, कडूस, म्हसोबा झाप, काटाळवेढा, पाडळी रांजणगाव, कळमकरवाडी, वडनेर, कोहोकडी, गाडीलगाव, तिखोल, हिंगणगाव, लोणी मावळा, नेप्ती, जवळे, पळशी, पाडळी आळे, बुगेवाडी, वडगाव गुंड आदी अनेक गावांतील शेत रस्ते व पानंद रस्त्यांचा समावेश आहे. या रस्त्यांमुळे पावसाळ्यात तुटणारा संपर्क कायमस्वरूपी सुटणार असून शेतीमाल वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ होणार आहे.

शेत व पानंद रस्त्यांमुळे शेतीत यांत्रिकीकरणाला मोठी चालना मिळणार आहे. ट्रॅक्टर, हार्वेस्टरसारखी अवजारे थेट शेतात नेता येणार असून पेरणी, मशागत, कापणी व मळणीसारखी कामे कमी वेळेत व कमी खर्चात पूर्ण होणार आहेत. पक्के रस्ते झाल्यामुळे पावसाळ्यातही शेतीची कामे अखंड सुरू राहतील. विशेष म्हणजे या रस्त्यांना कायदेशीर मान्यता व डिजिटल (GIS) नोंद मिळणार असल्याने अतिक्रमणे हटतील, वाद टळतील आणि शेतजमिनींच्या सीमा स्पष्ट होतील.

ग्रामीण दळणवळण, रोजगारनिर्मिती, शेती उत्पादनवाढ आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे या उद्देशाने आमदार काशिनाथ दाते सर यांनी संबंधित यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यातूनच ही भरीव आणि दूरगामी लाभ देणारी मंजुरी मिळाल्याचे बोलले जात आहे.

या ऐतिहासिक मंजुरीबद्दल आमदार दाते सर यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्यासह सहकार्य करणाऱ्या सर्व अधिकारी व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

ही मंजुरी म्हणजे पारनेर–नगर मतदारसंघातील ग्रामविकासाच्या दिशेने टाकलेले ठोस व निर्णायक पाऊल असून, आमदार काशिनाथ दाते सरांचे विकासाभिमुख, शेतकरीकेंद्री नेतृत्व पुन्हा एकदा ठळकपणे समोर आले आहे.

## जिव्हाळा फाउंडेशनचा मेळावा संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जिव्हाळा सोशल फाउंडेशनचा तिसरा वार्षिक मेळावा महाळुंगे पडवळ येथे हुतात्मा बाबू गेनू विद्यालयात पार पडला.या प्रसंगी झालेल्या कार्यक्रमा च्या अध्यक्षा,महाळुंगे पडवळ गावच्या सरपंच सुजाता  चासकर या होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून सावरगांव येथील माजी विद्यार्थी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री सुरेश भागवत उपस्थित होते.जिव्हाळा सोशल फाउंडेशनचे संस्थापक,अध्यक्ष दत्ता पडवळ यांनी आपल्या प्रास्ताविकातून मागील दोन वर्षात केलेल्या अनेक उल्लेखनीय कामाबद्दल उपस्थितांना माहिती दिली. गोर गरीब मुलांसाठी दत्तक योजना, गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव, माजी विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा, निसर्ग संवर्धनासाठी सामाजिक वृक्षारोपण, इत्यादी उपक्रमांबाबत त्यांनी उपस्थितांना माहिती दिली.राष्ट्रगीताने सुरू झालेल्या या कार्यक्रमा तील प्रमुख वक्ते श्री सुरेश भागवत यांच्या वक्तृत्वाने उपस्थितांना नवी उर्जा मिळवून दिली.आपल्या भाषणातून त्यांनी सांगितले की कार्यक्रमाला गर्दी पेक्षा ही दर्दी सदस्यांची गरज असते असे बोलतानाच त्यांनी जिव्हाळा सोशल फाउंडेशन पुढील काळात या भूमी वर आपल्या वैविध्यपूर्ण सामाजिक कामांचा ठसा उमटावेल असे म्हटले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा, महाळुंगे पडवळ गावच्या सरपंच सौ सुजाता चासकर यांनी मागील दोन वर्षात फाउंडेशनने केलेल्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.याप्रसंगी जिल्हा परिषद शाळा महाळुंगे पडवळचे मुख्याध्यापक रामदास भालेराव,जि.प. स्कुल कमिटी अध्यक्ष योगेश पडवळ, हु.बा.गे. विद्यालय स्कुल कमिटी अध्यक्ष लक्ष्मण थोरात, हु.बा. गे.प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रभाकर पडवळ, हु.बा.गे.युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाबाजी चासकर, हु. बा. गे. विद्या विकास फाउंडेशनचे अध्यक्ष के के सैद, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष परशुराम पडवळ इत्यादी मान्यवर उपस्थित होते.याप्रसंगी जिव्हाळा सोशल फाउंडेशनचे नांदूर गावातील सदस्य; प्रगतीशील शेतकरी अशोक  जाधव यांनी विद्यालयाच्या नवीन इमारत बांधकामा साठी ११,१११/- रुपयांची देणगी विद्या विकास फाउंडेशनचे खजिनदार श्री लक्ष्मण थोरात यांचेकडे सुपूर्द केली.

# पत्रकार हा समाजाचा आरसा – सुनील त्र्यंबके

### पत्रकार दिनानिमित्त सावेडीतील पत्रकारांचा सन्मान

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पत्रकार हा समाजाचा आरसा असून समाजातील वास्तव, प्रश्न, अन्याय आणि सकारात्मक बदल जनतेसमोर मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार करीत असतात. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांची भूमिका अत्यंत जबाबदारीची आहे, असे प्रतिपादन सुनील त्र्यंबके यांनी केले.

साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त सावेडी उपनगरातील पत्रकारांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुनील त्र्यंबके यांच्या हस्ते पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार अशोक झोटिंग, विजय सांगळे, सचिन कांबळे, संदीप जाधव, श्रीनिवास सामल, बाळासाहेब गागरे, विजय मते,संदीप कांबळे साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानचे पदाधिकारी, प्रभाग क्रमांक २ मधील उमेदवार रोशनीताई त्र्यंबके,निखिल वारे,महेश तवले,संध्याताई पवार, सुभद्रा त्र्यंबके, कविता भोसले, डॉ.प्रकाश त्र्यंबके, प्रविण भोसले, सुभाष निंबाळकर, महादेव शिरसाठ, आनंद कळंबे, देविदास गुडा,सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना सुनील त्र्यंबके म्हणाले,पत्रकार हा केवळ बातम्या देणारा घटक नसून तो समाजाला दिशा देणारा मार्गदर्शक आहे. ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न, अडचणी आणि अपेक्षा शासन व प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचे काम पत्रकार सातत्याने करत असतात. अनेकदा धोक्याची, दबावाची आणि आर्थिक अडचणींची परिस्थिती असूनही पत्रकार सत्याची बाजू मांडत राहतात, हे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे.

पुढे ते म्हणाले, आजच्या डिजिटल युगात बातम्यांचा वेग वाढला असला तरी सत्यता, सामाजिक भान आणि जबाबदारी जपणे अधिक गरजेचे झाले आहे. पत्रकारांनी केवळ सनसनाटीपणाऐवजी समाजहित, मूल्ये आणि सकारात्मक बदल यांवर भर द्यावा. अशा प्रामाणिक पत्रकारितेमुळेच समाज अधिक सुसंस्कृत आणि जागरूक बनेल. यावेळी आकाश त्रंबके यांनीही उपस्थित पत्रकारांचे कौतुक करताना सांगितले की,साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठान समाजोपयोगी उपक्रमांसोबतच समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यावर भर देत आहे.



पत्रकार दिनानिमित्त बोलताना अशोक झोटिंग म्हणाले सावेडीतील पत्रकारांचा सन्मान करून आम्हाला जो मान दिला आहे त्याबद्दल आनंद होत आहे. या प्रभागातील उमेदवारांनी प्रचाराच्या व्यस्त वेळेत देखील वेळ काढून आदर व्यक्त केला त्याबद्दल त्यांचे आभार मानले. या सन्मान सोहळ्यात पत्रकारांनीही आपल्या भावना व्यक्त करत केल्या सामाजिक उपक्रमांसाठी प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक केले. सूत्रसंचलन योगेश पिंपळे यांनी केले तर आभार निखिल त्र्यंबके यांनी मानले कार्यक्रमाचा समारोप सौहार्दपूर्ण वातावरणात झाला.

# गावाच्या शाश्वत विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना हे प्रभावी माध्यम : बाळासाहेब औटी

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे राष्ट्रीय सेवा योजना,समर्थ कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड मॅनेजमेंट बेल्हे,समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स,समर्थ लॉ कॉलेज,समर्थ इन्स्टिट्यूट फार्मसी व समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी,बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने " शाश्वत विकासासाठी युवक,पाणलोट आणि पडीक जमीन व्यवस्थापन " या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर राजुरी येथे ६ जानेवारी २०२६ ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये राजुरी येथे संपन्न होत आहे. या शिबिराचे उदघाटन राजुरी गावचे उपसरपंच माऊली शेठ शेळके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके,राजुरी ग्रामपंचायतचे उपसरपंच माऊली शेठ शेळके,अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे प्रांत संघटक तसेच भैरवनाथ देवस्थानचे आवटेवाडी चे अध्यक्ष बाळासाहेब औटी,शरदचंद्र पतसंस्थेचे खजिनदार तसेच भैरवनाथ देवस्थान आवटेवाडी चे खजिनदार अशोकशेठ औटी,गणेश दूध संस्थेचे चेअरमन सुभाष पाटील औटी,राजुरी ग्रामपंचायतचे सदस्य रंगनाथ पाटील औटी,सखाराम आप्पा गाडेकर,गणेश दुध संस्थेचे संचालक व पत्रकार गंगाराम औटी,महात्मा गांधी तंटामुक्ती समितीचे उपाध्यक्ष गणेशराव हाडवळे तसेच समर्थ कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट चे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे,समर्थ बीसीएस चे प्राचार्य डॉ.उत्तम शेलार,डॉ.लक्ष्मण घोलप, समर्थ लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ.सुनील कवडे,प्रा.शिवाजी कुमकर,समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.संतोष घुले,समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.कुलदीप रामटेके,डॉ.शरद पारखे,प्रा.दिनेश जाधव,प्रा.अश्विनी खटींग,प्रा.कल्याणी शेलार,प्रा.अजय भागवत,वल्लभ शेळके सर मित्र परिवाराचे सदस्य उपस्थित होते.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे बाळासाहेब औटी म्हणाले की,ई-पिक नोंदणी यापूर्वीही सर्वोत्तम पद्धतीने फार मोठ्या प्रमाणावर राजुरी गावामध्ये समर्थ संकुलातील विद्यार्थ्यांनी केलेली आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गावाचा शाश्वत विकास शक्य आहे. वनराई बंधाऱ्याच्या माध्यमातून तसेच जलसंधारणाच्या माध्यमातून स्नेहलताई शेळके यांनी गावामध्ये विविध प्रकल्प यशस्वीरित्या राबवलेले आहेत.पडीक जमिनीला पाणी कसे मिळेल यासाठी जलसंधारणाच्या माध्यमातून सर्वांनी एकत्र येऊन काम करायला हवं.यावेळी वल्लभ शेळके यांनी या शिबिरात "शाश्वत विकासासाठी युवक,पाणलोट आणि पडीक जमीन व्यवस्थापन" या उपक्रमाअंतर्गत डिजिटल लिटरसी,रस्ता सुरक्षा व पर्यटन विकास,नव मतदार जनजागृती नोंदणी व सर्वे, महिला सक्षमीकरण मेळावा,आरोग्य जागर, पर्यावरण संवर्धन,ग्राम सर्वेक्षण,ई -पीक पाहणी,आधार कार्ड व मतदार नोंदणी व जनजागृत,ई रेशन कार्ड,अन्नसुरक्षा व्याख्याने, नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर,स्त्री भ्रूण हत्या, जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण, महिला सक्षमीकरण, वनराई बंधारा, अंधश्रद्धानिर्मूलन पर जनजागृती कार्यक्रम,योगासने,स्त्री-पुरुष समानता,व्यसनमुक्त भारत,माझी वसुंधरा अभियान,पोस्टर सादरीकरण,स्वच्छता अभियान,वृक्षारोपण,स्थानिक इतिहास लेखन,एक मूठ धान्याची उपक्रम,शालेय स्पर्धा अशा अनेकविध उपक्रमांचा समावेश करण्यात आल्याचे सांगितले.

या शिबिरामध्ये एकूण २७५ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर यांनी तर डॉ.लक्ष्मण घोलप यांनी मानले.

# अमळनेरमध्ये 'पोलीस-पत्रकार महोत्सव' उत्साहात संपन्न

## विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान; सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय

**अमळनेर : (समर्थ गांवकरी)**

पत्रकार दिनाचे औचित्य साधून अमळनेर येथे मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात भव्य असा 'पोलीस-पत्रकार महोत्सव' मोठ्या उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व अमळनेर पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्यामुळे पोलीस व पत्रकार यांच्यातील समन्वय, परस्पर विश्वास व सामाजिक बांधिलकीचे प्रभावी दर्शन घडले.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री ॲड. विजय नवल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे होते. यावेळी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, माजी नगराध्यक्षा जयश्री पाटील यांच्यासह राजकीय, प्रशासकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दर्पणकार बाळशास्त्री जांबेकर व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

उदघाट्न भाषणात माजी केंद्रीय मंत्री ॲड विजय नवल पाटील यांनी सांगितले की, पोलीस आणि पत्रकार यांची सामाजिक बांधिलकी ही उल्लेखनीय आहे. पत्रकार हा समाजमानचा आरसा तर नागरिक आणि शासनां मधील दुवा असतो. पत्रकारिता ही समाजातील अनिष्ठ घटनावर प्रहार करणारी तर चांगल्या गोष्टी प्रकाशात आणण्यासाठी असली पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा आपल्या वृतपत्राद्वारे सामाजिक अनिष्ठ प्रथेवर आसूड ओढून समाजात अमूलाग्र बदल घडवीला. सत्ता स्थित्यातंरात पत्रकार हा अहम भूमिका बजावत असतो तर पोलीस हा सामाजिक आरोग्य सुद्दढ राखण्यात कसोशीने प्रयत्नशील असतो. याप्रसंगी पोलीस व पत्रकार दिना निमित्ताने घेण्यात आलेल्या मैत्रीपूर्ण क्रिकेट सामनातील विजेत्या पोलीस संघाला मान्यवरांच्या हस्ते विजेती ट्रॉफी देण्यात आली. सामनातील उत्कृष्ट फलंदाज प्रल्हाद सूर्यवंशी यांना तर उत्कृष्ट गोलंदाज राहुल पाटील यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. तसेच गीत गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक पत्रकार मुन्ना शेख, निबंध स्पर्धेत गट अ मधील प्रथम क्रमांक दिक्षिता भामरे, गट ब मध्ये श्रुती शिरसाठ, गट क मध्ये कृष्णा निकम यांना विशेष सन्मान चिन्ह व सहभाग प्रशस्ती पत्र देण्यात आले. तसेच पत्रकार संघटने कडून खान्देशी कलाकारानां ही विशेष सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले.




विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याचा गौरव समाजाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांना यावेळी विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये— आ. अनिल भाईदास पाटील व ओमप्रकाश मुंदडा ( अमळनेर भूषण),ॲड. विजय नवल पाटील व भिकन पाटील (शिक्षण महर्षी) प्रा शिवाजीराव पाटील (साहित्य रत्न)पांडुरंग पाटील (जीवन गौरव (पत्रकारिता)मंगळग्रह मंदिर देवस्थान(आदर्श देवस्थान)डॉ. जी. एम. पाटील (आरोग्य देवदूत) डॉ. प्रशांत शिंदे (आदर्श आरोग्य सेवादूत)महेश पाटील( आदर्श लोकसेवक)अमळनेर वाहतूक पोलीस विभाग( उत्कृष्ट सेवा) सिद्धांत सिसोदे (आदर्श पोलीस कर्मचारी)अनिता सुरडकर (आदर्श शिक्षिका)कैलास पाटील (उद्योगरत्न)विक्की जाधव (आदर्श उद्योजक)प्रितेश पारख, रोनक संकलेचा, जितेंद्र गुंजाळ, प्रेमकुमार सासनाणी ( युवा उद्योजक) किरण (कृष्णा) बहारे (समाज भूषण) ज्ञानेश्वर धनगर (आदर्श समाजसेवक)सौ. रिता बाविस्कर (आदर्श सामाजिक कार्यकर्त्या) प्रवीण पाटील (उत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ता)डिगांबर वाघ (उत्कृष्ट अभियंता)एकनाथ सोनवणे (आदर्श वृत्तपत्र वितरक)गोविंद गायकवाड (उत्कृष्ट गायक) रविंद्र भोई (उत्कृष्ट कलाकार) अजय शिवरामे (आदर्श कर्मचारी) पारस गोल्ड (आदर्श सुवर्णकार) नितीन पाटील( आदर्श सरपंच)

सदरच्या महोत्सवात खानदेशातील अहिराणी कलाकार पुष्पा ठाकूर,गोविंद गायकवाड, रवींद्र भोई,भैया मोरे, शशांक संदानशिव,अल्ताफ राजा, जगदीश, आकाश पवार,राजा दाभाडे आदींनी आपल्या नृत्य व गायनाने उपस्थितांचे मन जिंकली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश काटे व प्रसिद्धी विनोदी कलाकर विलास शिरसाठ यांनी केले तर आभार प्रा डॉ विजय गाढे यांनी केले. हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. यामध्ये प्रामुख्याने:डॉ. समाधान मरळे (उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष, इलेक्ट्रॉनिक मीडिया विभाग तथा तालुकाध्यक्ष)प्रा. डॉ. विजय गाढे (खान्देश उपाध्यक्ष) सुरेश कांबळे (जिल्हा सरचिटणीस)यदुवीर पाटील (जिल्हा उपाध्यक्ष)नूर खान पठाण व प्रवीण बैसाणे (तालुका उपाध्यक्ष)आत्माराम अहिरे (तालुका संघटक)हितेंद्र बडगुजर (तालुका कार्याध्यक्ष) गणेश चव्हाण (तालुका प्रसिद्धीप्रमुख)सुरेंद्र जैन, राहुल भदाणे, रिजवान मनियार, योगेश वाणी, सत्तार खान, किशोर वाणी (तालुका सदस्य)या सर्व टीमच्या नियोजनामुळे व एपीआय शिरसाठ,पीएसआय समाधान गायकवाड, पोकॉ सिद्धातं सिसोदे यांच्या विशेष सहकार्य मुळे हा सोहळा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. पोलीस आणि पत्रकारांच्या या एकत्र येण्यामुळे शहरात सलोख्याचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या तात्काळ व प्रभावी वापरामुळे, हरवलेला १५ वर्षांचा मुलगा ३० मिनिटांत शोधण्यात विरगाव ग्रामस्थांना यश

**(समर्थ गांवकरी)**

गुरुवार 08/01/2026 रोजी अकोले पोलीस स्टेशन हद्दीतील विरगाव तालुका अकोले जिल्हा अहिल्यानगर गावातील बालक नामे कु.साहिल रंगनाथ साळुंखे वय 15 वर्षे गावातीलच स्वामी विवेकानंद विद्यालयात शिकत होता. नेहमीप्रमाणे आज सकाळी शाळेत गेल्यानंतर शिक्षकांनी गृहपाठाची वही मागितली आणि त्याने गृहपाठ पूर्ण केलेला नव्हता;त्यामुळे त्याने वेगळीच शकल लढवली त्याने शिक्षकांना सांगितले की, माझी गृहपाठाची वही घरी राहिलेली आहे. ती मी जाऊन घेऊन येतो आणि तो शाळेबाहेर पडला आता अभ्यास तर केलेलाच नव्हता;त्यामुळे तो घाबरला आणि घराकडे न जाता तो सरळ अकोल्याकडे जाणाऱ्या दोन-तीन मोटरसायकल वाल्यांना ना हात दाखवून त्यांची मदत घेत घेत तो अकोल्यात पोहोचला



आणि अकोल्यात इकडे तिकडे फिरू लागला.इकडे गावाकडे आणि घरी मात्र याची कोणालाच कल्पना नव्हती. सायंकाळी 6 वाजता आई-वडील ज्यावेळी कामावरून घरी येऊन बघिताय तर काय! मुलगा घरात दिसेनासा झाला,हे कळताच कुटुंबीयांनी शेजारी/पाहुणे यांच्याकडे खूप शोधाशोध करूनही मुलगा सापडत नाही,हे लक्षात येताच सायंकाळी 7 वाजता गावातील सामाजिक कार्यकर्ते अण्णासाहेब थोरात यांनी ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या हेल्पलाइन(18002703600) नंबर वरून ही माहिती तात्काळ आसपासच्या संपूर्ण गावाला कळवली आणि सदर बातमी वाऱ्याच्या वेगाने संपूर्ण गावात पसरली आणि तात्काळ विरगाव ग्रामस्थ मदतीसाठी घटनास्थळी एकवटले आणि त्या 15 वर्षांच्या मुलाची शोध मोहीम युद्ध पातळीवर सुरू झाली. कुटुंबीयाच्या काळजाचे जणू पाणी पाणी झाले!! जणू काळजाचे ठोकेच चुकले होते!! मनात वेगवेगळे विचार घर करून जात होते. आसपासच्या परिसरामध्ये बिबट्याचा वावर असल्याने भीती जास्त बळावत चालली होती.सर्व गावकरी जीवाच्या आकांताने मुलाचा शोध घेत होते.

आणि अखेर आज गुरुवार असल्याकारणाने गावातील बरेच नागरिक बाजार निमित्त अकोल्याला जात असतात त्यातील खिमाबाई गोमाजी मधे आणि त्यांचे पती गोमाजी मधे हे दोघेही बाजार निमित्त अकोल्यात आलेले होते.बाजार आवरून गावाकडे जाण्यासाठी बस स्टँड वर आले असता त्यांना आत्ताच आपल्या गावातील हरवलेला मुलाचं वर्णन ऐकलेला कु.साहिल रंगनाथ साळुंखे बसलेला दिसून आला आणि त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता त्या मुलाला घेऊन गावाच्या दिशेने निघाले आणि मुलाला घेऊन गावात पोहोचले असता मुलाला सुखरूप पाहून मुलाचे आई-वडील आणि विरगाव ग्रामस्थांचा जीव भांड्यात पडला.

विरगाव ग्रामस्थांच्या प्रयत्नातून गावात ग्राम सुरक्षा यंत्रणा प्रभावी राबविली जात आहे. आजवर विरगाव गावात ग्रामसुरक्षा यंत्रणेचा विविध सूचना देण्यासाठी 225 वेळा वापर करण्यात आला आहे.

जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे जिल्ह्यात ग्राम सुरक्षा यंत्रणा बंद अहिल्यानगर जिल्हा पोलीस दल व जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचा संयुक्त उपक्रम असणाऱ्या ग्रामसुरक्षा यंत्रणेत जिल्ह्यातील 1197 गावे सहभागी आहेत.

### ग्राम सुरक्षा यंत्रणेची उद्दिष्ट

- घटनाग्रस्त नागरिकांना परिसरातील नागरिकांची तातडीने मदत मिळणे.
- गावातील कार्यक्रम / घटना विना विलंब नागरीक/ ग्रामस्थांना एकाच वेळी कळवणे.
- अफवांना आळा घालणे.
- प्रशासनाला नागरिकांशी जलद संवाद साधता येणे.
- पोलीस यंत्रणेस कायदा व सुव्यस्था कायम राखणे कामी नागरिकांचे सहकार्य मिळणे.

### ग्राम सुरक्षा यंत्रणेची वैशिष्ट्ये

- संपूर्ण स्वयंचलित यंत्रणा
- गावासाठी यंत्रणा सुरु करणे व सहभागी होण्यासाठी सोपी पद्धत
- संपूर्ण भारतासाठी एकच टोलफ्री नंबर 18002703600/9822112281
- यंत्रणेत सहभागी असलेला कोणताही नागरिक आपत्ती काळात संपूर्ण परिसराला सावध करू शकतो.
- संदेश देणाऱ्या व्यक्तीच्या आवाजातच संदेश कॉल स्वरुपात परिसरातील नागरिकांना मिळतो.
- दुर्घटनेचे स्वरूप, तीव्रता , ठिकाण कळल्याने गावकऱ्यांना विना विलंब व नियोजनबद्ध मदत करता येते.
- नियमानुसार दिलेले संदेशच स्वयंचलित रित्या प्रसारित होतात
- नियमाबाह्य दिलेले संदेश/ अपूर्ण संदेश रद्द होतात व प्रसारित होत नाहीत.
- एका गावात चोरी करून चोर दुसऱ्या गावच्या दिशेने गेल्यास त्या गावालाही सावध करणे शक्य.
- वाहन चोरीचा संदेश आजूबाजूच्या 10 किमी परिसरातील सर्व दिशांच्या गावांना तत्काळ मिळतो.
- घटनेच्या तीव्रतेनुसार कॉल रिसीव्ह होत नाही,तोपर्यंत रिंग वाजते.
- संदेश पुढील 1 तास पुन्हा पुन्हा ऐकण्याची सोय. कोणत्याही वेळी आपल्यासाठी संदेश तपासण्याची सोय.
- चुकीचा संदेश किंवा मिसकॉल देणारे नंबर आपोआप Black List होतात.
- गावाबाहेर दुसऱ्या गावात अपघातग्रस्त नागरिकाचा संदेश घटना घडलेल्या परिसरातही प्रसारित होतात.
- सरकारी कार्यालये/ पोलीस स्टेशन आदींना आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना किंवा विशिष्ट एक किंवा एकापेक्षा जास्त गावांना किंवा कर्मचाऱ्यांना सूचना / आदेश देता येणे शक्य होत आहे.

# NovaWatch ही स्मार्टवॉच मालिका सादर

**नवी दिल्ली: (समर्थ गांवकरी)**

Ai+ ने आज NovaWatch सादर केले, त्याची स्मार्टवॉच लाइनअप जी सुरक्षा, दैनंदिन आरोग्य आणि वैयक्तिक शैलीमध्ये ब्रँडच्या कनेक्टेड डिव्हाइस पोर्टफोलिओचा विस्तार करते. Q1 2026 मध्ये लॉन्च होणारे, NovaWatch हे Ai+ च्या विश्वासाचे प्रतिबिंबित करते की घालण्यायोग्य तंत्रज्ञानाने फॅशन-फॉरवर्ड डिझाइनसह व्यावहारिक उपयुक्तता एकत्र केली पाहिजे. Ai+ NovaWatch लाइनअपमध्ये Active, Wearbuds, Kids Geo फेंसिंग घड्याळ आणि उद्योगात प्रथमच, फिरता कॅमेरा LTE घड्याळ यांचा समावेश आहे, प्रत्येक विशिष्ट वापराच्या बाबतीत डिझाइन केलेले आहे. एकत्रितपणे, श्रेणी दररोजच्या आरोग्याचा मागोवा, कौटुंबिक सुरक्षितता




आणि शैली-नेतृत्वाखालील वैयक्तिक अभिव्यक्ती समाविष्ट करते, जे विविध जीवन आणि वयोगटांमध्ये नैसर्गिकरित्या फिट असलेल्या वेअरेबलवर Ai+ चे लक्ष प्रतिबिंबित करते. ॲक्टिव्ह हे रोजच्या वापरकर्त्यांसाठी डिझाइन केलेले आहे ज्यांना स्वच्छ, प्रवेशयोग्य स्वरूपात विश्वासार्ह आरोग्य ट्रॅकिंग हवे आहे. पहिल्या दिवसापासून परिचित आणि वापरण्यास सोपी वाटणारी रचना आणि उद्योगात पुन्हा एकदा प्रथम असलेल्या फॉर्म फॅक्टरसह हे आवश्यक निरोगीपणा मेट्रिक्सवर लक्ष केंद्रित करते.

# झाडांचा आदर्श घेऊन विश्वावरती प्रेम करावे - डॉ. मधुसूदन घाणेकर

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**

झाड ज्याप्रमाणे फुलं आणि सावली देताना फरक करत नाही दरोडेखोर किंवा सज्जन असो, कोणी छोटा किंवा मोठा असो, प्राणी असो किंवा पक्षी सर्वांना झाड प्रेम देते. षडरिपूंवरती मात करते ते म्हणजे झाड तोच आदर्श घेऊन आपण सगळ्या विश्वावरती प्रेम करावं. असे अध्यक्षीय मनोगतात घाणेकर यांनी विचार व्यक्त केले.




साहित्य सम्राट पुणे संस्थेने २१४ वे कवी संमेलन झाडांच्या कविता या विषयावर भारतीय विकास साधना सदाशिव पेठ पुणे येथे आयोजित केले होते. मंचावरती तितिक्षा पुणेच्या संस्थापिका प्रमुख पाहुण्या प्रिया दामले, २१४ वे अध्यक्ष मधुसूदन घाणेकर, संस्थापक विनोद अष्टुळ आणि कविराज विजय सातपुते उपस्थित होते. त्यावेळी ते पुढे म्हणाले की दोनशे चौदा कवी संमेलने सातत्याने घेणे सोपे नाही म्हणून आपण आपल्याच माणसाचे कौतुक, सदभावनेने सन्मान करतो हे फार महत्त्वाचे आहे. तसेच कशा पद्धतीने करतो त्या पाठीमागची भावना आपण लक्षात घ्या. मी आपणा सगळ्यांना विनंती करतो की आपण सगळ्यांनी उभे राहून जोरदार टाळ्यांच्या गजरात साहित्य सम्राटचा सर्वेसर्वा विनोद अष्टुळ यांचे अभिनंदन करूया.

कवी संमेलनाची सुरुवात संविधान उद्देशिकेच्या वाचनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विनोद अष्टुळ यांनी वास्तविक प्रसंगाचे भान ठेवून माणुसकी आणि साहित्य सेवा घडवणारे विविध उपक्रम कसे तयार झाले. याची माहिती सांगून आजच्या वनराई जाळल्याच्या निषेधार्थ वृक्षांच्या कविता हा विषय साहित्यिकांपुढे सादरीकरणासाठी दिला. याप्रसंगी विश्वविक्रमी डहाळी या अनियत कालिकेच्या १०१८ व्या अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच साहित्य सम्राट सन्मान पुरस्कार २०२६ हा पुरस्कार डॉ. मधुसूदन घाणेकर यांना साहित्यसम्राट संस्थेच्या वतीने प्रदान करण्यात आला.

या कवीसंमेलनामध्ये झाडांमधली माणुसकी आणि माणसामधले झाड यांची सुरेख अनुभूती देणाऱ्या दर्जेदार कविता सादर करणारे आदरणीय सर्व कविजन डॉ. मधुसूदन घाणेकर, प्रिया दामले, विनोद अष्टुळ, बाबा ठाकूर, श्रीकांत वाघ, नीला चित्रे, अँड. राजेंद्र पाचुणकर, इंदिरा पूनावाला, शिवाजी उराडे, नकुसाबाई लोखंडे, गणपत तरंगे, संजय माने, ॲड.संध्या देशपांडे, ॲड.संध्या गोळे, सारिका सासवडे, किशोर टिळेकर, नंदकिशोर गावडे, डॉ.आनंद महाजन, सूर्यकांत नामुगडे, विजय सातपुते, आणि इतर अनेक कवी कवयित्रींनी आपल्या वृक्षांच्या कविता सादर करून शब्दांची वनराई फुलवली. अशा या बहारदार कवी संमेलनास रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

कवी संमेलनाचे सूत्रसंचालन विजय सातपुते यांनी तर आभार शिवाजी उराडे यांनी उत्कृष्टरित्या मानले.